दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार,दि.१९ मे २०२५ | वर्ष४थे | अंक२७४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३





# कराडची बी गँग ॲक्टिव्ह!

शिवराज दिवटेला मारहाण करणारे त्यांचेच लोक

आ.सुरेश धस यांचा खळबळजनक दावा

आरोपींवर मकोका लावण्याची मागणी

## संतोष देशमुख पार्ट टू करु, अशी दिली धमकी

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:तालुक्यात शिवराज दिवटे नावाच्या तरुणाला दहा ते बारा जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. अपहरण करून एका टेकडीवर नेत त्याला पट्टा, लोखंडी रॉड आणि काठीने मारहाण करण्यात आली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण खूनाची दहशत अद्याप कायम आहे. त्यात पुन्हा एका तरुणाचे अपहरण करून त्याला मारहाण आणि तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी दिलेली धमकी यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे. आमदार सुरेश धस यांनी हे त्यांचेच लोक आहेत असे म्हणत वाल्मीक कराड गँगकडे बोट दाखवले आहे.

वाल्मीक कराड जेलमध्ये असला तरी त्यांची बी गँग परळी आणि बीड जिल्ह्यात अजूनही ॲक्टिव्ह आहेच. महाकालचे भस्म आणि कपाळावर गंध लावणारे हे त्यांचेच पोरं आहेत. शिवराज दिवटेला मारहाण करत संतोष देशमुख पार्ट टू करण्याचाच त्याचा प्रयत्न होता, तसं त्यांनी बोलूनही दाखवले आहे. पण दिवटे थोडक्यात वाचला असे म्हणत सुरेश धस यांनी पुन्हा एकदा परळीतील गँगवार आणि त्यांच्या आकांचा उल्लेख करत या प्रकरणातील आरोपी आणि वाल्मीक कराड गँगचे संबंध असल्याचे सूचित केले आहे. शिवराज दिवटे याला अपहरण करून जीवे मारण्याचा प्रयत्न शुक्रवारी झाला. या मारहाणीचे व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. शिवाय दिवटे यांने आरोपींनी मारहाण करतांना तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी धमकी दिल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर आज बीड-परळी रोडवरील गोपीनाथ गड रस्त्यावर लिंबोटा ग्रामस्थांनी आरोपींवर मकोका लावण्याची मागणी करत रास्तारोको केला. तर मराठा संघटनांकडून बीड बंदची हाकही देण्यात आली.दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावर भाष्य करताना आरोपींचे वाल्मीक कराड व इतर नेत्यांसोबत फोटो आल्याचा दावा केला. हे त्यांचेच लोक आहेत, वाल्मीक कराडी बी गँग जिल्ह्यात ॲक्टिव्ह आहे. शिवराज दिवटे याचा संतोष देशमुख होता होता राहिला, असे सांगत या महाकाल टोळीचा बंदोबस्त करावा लागेल, असेही धस म्हणाले.

### आरोपी कोणाच्या जवळचे

काल धनंजय देशमुख शिवराज दिवटे याची अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात जाऊन भेट घेतली होती. ही मारहाण आणि दिवटेला देण्यात आलेली धमकी हा गंभीर प्रकार आहे. ज्या आरोपींनी ही अमानुष मारहाण केली ते कोणाच्या जवळचे आहेत, हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट आहे, असे सांगत धनंजय देशमुख यांनीही आरोपींचा वाल्मीक कराड गँगशी संबंध असल्याचे सूचक विधान केले होते. तर दुसरीकडे या प्रकरणातील आरोपी कोणत्या कोणत्या समाजाचे आहेत, हे सांगत याला जातीय रंग न देण्याचे आवाहन बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी केले होते.

## ‘त्या’ आपहरण प्रकरणी ‘नवा ट्विस्ट’

पर्दाफाश:’किडनॅपिंग नव्हे तेलंगाणा पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन’

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:परळीतील अपहरण प्रकरणाला नवीन ट्विस्ट समोर आला आहे. ते अपहरण नसून तेलंगणा पोलिसांचे कॉम्बिंग ऑपरेशन होते . त्या परळीतील त्या युवकास एका गंभीर गुन्ह्यात तेलंगणा पोलिसांनी परळी मधून तडकाफडकी उचलले होते. या बाबत सविस्तर वृत्त असे कि ,

गेल्या काही दिवसांपूर्वी परळीच्या मुख्य रस्त्यावरून सायंकाळी सुमारास एका इसमाला चार ते पाच लोकांनी पांढऱ्या इनोव्हा गाडीत उचलून घेऊन गेल्याचा प्रकार पुढे आला होता. याप्रकरणी अपहरण करण्यात आल्याचा गुन्हाही दाखल करण्यात आला. परळी पोलिसांनी याचा युद्धपातळीवर तपास केला.

राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक ते गणेशपार रोड या मुख्य रस्त्यावरील एका हॉटेल जवळून दि. ०६/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५.४५ वाजण्याचे सुमारास पिडीत इसम नामें शेख अमजेद अहमद शेख वय ३५ वर्ष रा. बरकत नगर परळी वै यास अनोळखी पाच ते सहा लोकांनी पकडुन रोडवर उभ्या केलेल्या पांढऱ्या रंगाच्या ईन्व्हा गाडी मध्ये बळजबरीणे टाकुन घेवुन गेले अशी फिर्याद देण्यात आली. यावरुन पो.स्टे. संभाजीनगर परळी वै. येथे तात्काळ गुन्ह्याची नोंदही करण्यात आली. मात्र प्रथमदर्शनी या इसमाची पार्श्वभूमी तपासली असता त्याचे आपहरण व्हावे या पातळीचे कोणतेच ठोस कारण पुढे आलेले नव्हते. पिडीत इसम हा टेलरकाम करणारा असल्याची माहिती मिळाली. कारागिर म्हणून टेलरिंगची कामे तो करतो. त्यामुळे या अपहरणाचे कारण शोधणे उत्सुकतेचे ठरले होते. मात्र आपहरण करण्यासाठीच्या जवळपास सर्वच पैलूंची पडताळणी पोलीसांनी केली असता ठोस मुद्दा समोर आलेलाच नाही. त्यामुळे आता खरोखरच हे अपहरण झाले की अन्य काही प्रशासकीय तपास, पोलीस प्रक्रिया आदी कारणांसाठी घेऊन गेले असे तर्क वर्तवण्यात पान २ वर

### ’किडनॅपिंग नव्हे कोम्बिंग ऑपरेशन’

या प्रकरणाचा पोलीस तपासातून नवीनच उलगडा झाला असुन ज्या व्यक्तीचे परळीतून आपहरण झाले अशी फिर्याद पोलीस ठाण्यात देण्यात आली होती वास्तविक ते आपहरण नव्हते तर तेलंगणा पोलीसांचे तपास पथक होते. एका गंभीर गुन्ह्यात संबंधित इसमाचे नाव उलगडले होते. त्याचा शोध घेत तेलंगणा पोलीसांनी धडक कारवाई करत त्याला आहे त्या स्थळावरुन आहे त्या स्थितीत ताब्यात घेतल्याचे आता स्पष्ट झाले आहे. याबाबत परळीच्या संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रकरणाचा अंतिम छडा लावण्याची कामगिरी बजावली असुन हे प्रकरण सर्व तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करीत न्यायालयापर्यंत पोहविण्यापर्यंतची जलदगती कारवाई पूर्ण केली आहे.

## मान्सून वाऱ्याच्या वेगाने दाखल होणार

दिलासा:यंदा भरपूर पाऊस, हवामान खात्याचा अंदाज

पुण्यभूमी प्रतिनिधी



पुणे : केरळात वा-याच्या वेगाने दाखल होणारा मान्सून यंदा महाराष्ट्रातही लवकर दाखल होणार आहे. केरळमध्ये अंदाजे २७ मे रोजी मान्सून (चार दिवस कमी-अधिक) दाखल होईल, अशी सरासरी तारीख अपेक्षित धरली तरी राज्यात मान्सून कोणत्या क्षणी दाखल होईल, अशी तारीख देता येत नाही. त्यास अनेक कारणे असले तरी यंदा राज्यात मान्सून भरभरून कोसळणार असल्याचे संकेत आहेत.यंदाच्या चार महिन्यांत प्रत्येक महिन्याला, प्रत्येक आठवड्याला पाऊस चांगला असेल, असे गृहीत धरणे योग्य नाही. कारण, विस्तृत पूर्वानुमान गृहीत धरले असले तरी शेतक-यांनी कृषी विभागाशी समन्वय ठेवून शेतीच्या कामाचे नियोजन करणे अपेक्षित आहे. रेड, ऑरेंज अलर्टवर शेतक-यांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. तीन ते चार तासांच्या पावसावरही शेतक-यांनी लक्ष ठेवून स्वत:ची आणि पशुधनाची काळजी घेणे गरजेचे आहे. कृषी विभाग आणि हवामान विभाग यांची जोड कायमच शेतक-यांसोबत असून आता हवामान विभागाने ब्लॉकस्तरीय अंदाज आणि पंचायत स्तरावर सल्ले देण्यास सुरुवात केली आहे.

मौसम ॲप, मेघदूत ॲप आणि दामिनी ॲपसारखे पान २ वर

## आज उपमुख्यमंत्र्यांचा जिल्हा दौरा

माहिती:पालकमंत्री अजित पवारांचा दौरा

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार उद्या सोमवार, दि. १९ मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे. सकाळी ८:०५ वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण.सकाळी ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण.सकाळी ९:०० वाजता शासकीय विश्रामगृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ९.०० पान २ वर

## दिवटे, कुटुंब माझ्या घरातले

धनंजय मुंडे:आरोपींवर कठोर कारवाई करावी

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:दोन दिवसांपूर्वी परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय पान २ वर

## दुर्लक्षित | नागरिकांना सोसावा लागतोय त्रास

## परळी-गंगाखेड हायवे पुलाचे काम रखडले!

पुण्यभूमी प्रतिनिधी






परळी:परळी-गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे काम गेल्या ३ वर्षांपासून रखडले असून फक्त ५ फुटांच्या रस्त्याच्या वादांमुळे हे काम रखडले आहे. यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

परळी - गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता रुंदीकरणाचे काम गेल्या चार ते पाच वर्षांपासून सुरू असून संपूर्ण रस्ता पुर्ण झाला आहे मात्र या रस्त्यावरील पुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडले आहे. या रस्त्यावरील फक्त पाच फुटांच्या जागेसाठी हे काम रखडले आहे. या रस्त्याच्या जागेचा जमीनमालक प्रदिप तातेड व रेखा फड या दोघांमध्ये जागेचा वाद सूरु असल्याचे महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या वादामुळे पुलाचे काम रखडले आहे. काम रखडल्याने या रस्त्यावरील प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून राजकीय प्रस्थामुळे या वादाकडे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व महामार्गाचे अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी यांच्यातील वाद मिटवून पुलाचे काम लवकरात लवकर पान २ वर

अमित उबाळे सहाय्यक अभियंता यांनी सांगितले की, गेल्या वर्ष भरापासून जमीनमालक दोघांतील पाच फुट जागेचा वाद सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहोत. मात्र शेतकऱ्यांचे सहकार्य मिळत नाही तरी आम्ही प्रयत्न करत आहोत.

ॲड रेखा फड यांनी सांगितले की, आमच्या प्लॉटींग मध्ये या रस्त्यावरील पाणी येत आहे ते पाणी समोरील रतन सिटीच्या प्लॉटींग मधून हे पाणी काढावे. नाला सुरळीत करावा व तातडीने हे काम पूर्ण करावे अशी मागणी त्यांनी केली.

## मराठा संघटनांची बंदची हाक

मारहाण प्रकरण:शिवराज दिवटेसाठी समाज रस्त्यावर



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:परळी तालुक्यातील लिंबोटा गावातील तरुण शिवराज दिवटे याला सप्ताहात झालेल्या किरकोळ वादावरून १९ ते २० तरुणांनी काठी,बेल्ट आणि रॉडने मारहाण केली. या प्रकरणामध्ये मराठा संघटना आक्रमक झाल्या असून त्यांनी सोमवार दि. १९ मे रोजी परळी आणि बीड बंदची हाक दिली आहे.

शिवराजला मारहाण करणा-या सात जणांना अटक करण्यात आली आहे. मात्र, आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करा आणि मारहाणीमध्ये सहभागी असलेल्या इतरांना अटक करा यासाठी लिंबोटा गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले. त्यांनी बीड-परळी मार्गावर ठिय्या आंदोलन केले. जोपर्यंत मागण्या पान २ वर

## दोन दिग्गजांची निवृत्ती

पहलगाममधील अतिरेकी हल्ल्याला उत्तर देताना भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारा पाकिस्तानला एकामागून एक दणके दिले. या दणक्यांमुळे पाकिस्तानची होत असलेली ससेहोलपट पाहणे, ऐकणे हा रोमांचकारी अनुभव होता. याच कालावधीत भारतात आयपीएलचे युद्ध रंगात आले होते. 'युद्धस्य कथा रम्य' असतात, असे म्हटले जात असले तरी क्रिकेट युद्ध सुरू असताना ज्या दोन कथा कानावर आल्या त्या हृदयद्रावक होत्या. पहिली कथा म्हणजे भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रो-हिट शर्माने कसोटी क्रिकेटला ठोकलेला रामराम आणि त्यानंतर चारच दिवसांनी किंग कोहलीने कसोटी क्रिकेटला केलेला अलविदा! आगामी इंग्लंड दौरा महिनाभरावर आला असताना हे दोन्ही दिग्गज पांढ-या जर्सीमध्ये दिसणार नाहीत. भारतीय संघ जून महिन्यात इंग्लंडच्या दौ-यावर जाणार असून तेथे तो ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या दौ-यात भारतीय संघाला या दोन दिग्गजांची अनुपस्थिती नक्की जाणवेल. रोहित आणि विराटने टी-२० व कसोटी क्रिकेटला रामराम केला असला तरी दोघेही एकदिवसीय क्रिकेट खेळणार आहेत.दोघांच्याही निवृत्तीच्या निर्णयामुळे क्रिकेट चाहत्यांना धक्का बसणे साहजिक आहे; पण 'जुने जाणार, नवे येणार' ही जगरहाटी चालूच राहणार आहे. 'राम-कृष्ण ही आले गेले, त्या विण का जग ओसची पडले?' हा सृष्टीचा नियम आहे. हे सारे खरे असले तरी रोहित आणि विराटने केलेली भारतीय क्रिकेटची सेवा अविस्मरणीय राहील यात शंका नाही. ३८ वर्षीय रोहितने गतवर्षी टी-२० विश्वचषक उंचावल्यावर त्या प्रकारातून निवृत्ती जाहीर केली होती. त्यानंतर रोहित फक्त कसोटी व एकदिवसीय प्रकारात भारताचे नेतृत्व करत होता मात्र न्यूझिलंडविरुद्ध भारताने मायदेशात ०-३ असा पराभव पत्करला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्धही बॉर्डर-गावस्कर मालिका १-२ अशा फरकाने गमावली. या दोन्ही मालिकांमध्ये कर्णधार व फलंदाज म्हणून रोहित सपशेल अपयशी ठरला तसेच वेगवान गोलंदाजांसमोर तो चाचपडताना दिसला. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्यातही तो अपयशी ठरला. तेव्हापासूनच त्याच्या कसोटीतील भविष्याविषयी चर्चा सुरू झाली. जानेवारीत ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका झाल्यानंतर त्याने एकदिवसीय प्रकारात भारताचे यशस्वी नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने १२ वर्षांनी चॅम्पियन्स ट्रॉफी उंचावली. रोहितने २४ कसोटीत भारताचे नेतृत्व केले त्यापैकी १२ कसोटीत विजय मिळवला तर ९ कसोटी गमावल्या. रोहितने ६७ कसोटीत ४०.५७ च्या सरासरीने ४३०१ धावा काढल्या. त्यात १२ शतके आणि १८ अर्ध शतकांचा समावेश आहे. कसोटीत २१२ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या. 'सिक्सर किंग' म्हणून प्रसिद्ध असलेल्या रोहितचा लिलया षटकार ठोकण्यात हातखंडा होता. इंग्लंड दौ-यासाठी राष्ट्रीय निवड समिती नव्या कर्णधाराच्या शोधात असल्याची चर्चा होती. आधीच रोहितने कसोटीतून निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर चारच दिवसांनी कसोटी क्रिकेटमध्ये भारताला सर्वोच्च शिखरावर घेऊन जाण्यात मोलाची भूमिका बजावणारे 'विराट' वादळ सोमवारी शमले. भारताचा दिग्गज फलंदाज, 'किंग' म्हणून ओळखला जाणारा आणि निकटवर्तीयात 'चिकू' म्हणून प्रसिद्ध असलेल्या विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली त्यामुळे आठवडाभरातच देशभरातील आणि जगभरातील क्रिकेट रसिकांना दुहेरी धक्का बसला.

सोमवारी दुपारी विराटने इन्स्टाग्रामवर पोस्ट टाकून १४ वर्षाच्या कसोटी कारकिर्दीला पूर्ण विराम दिला. भारताच्या क्रिकेट इतिहासातील सर्वोत्तम कर्णधार म्हणून नावाजलेल्या विराटने १२३ कसोटीमध्ये ९२३० धावा काढल्या. यात ३० शतके आणि ३१ अर्धशतकांचा समावेश आहे. कसोटी क्रिकेटच्या पांढ-या पोषाखात आपल्या देशाचे प्रतिनिधीत्व करण्यात एक वेगळाच अनुभव होता, असे विराटने म्हटले आहे. 'रनमशिन', 'चेस मास्टर', 'भारतीय क्रिकेटचा आक्रमक चेहरा' अशा विशेषणांचा धनी असलेल्या विराटने निवृत्ती जाहीर करून क्रिकेटप्रेमींना मोठा धक्का दिला आहे. विराटने ६८ कसोटीत भारताचे नेतृत्व केले त्यापैकी ४० कसोटीत भारताने विजय मिळवला. भारतासाठी सर्वाधिक कसोटी सामने जिंकणा-यांच्या यादीत विराट अव्वल स्थानी आहे. त्याच्या निवृत्तीने कसोटी क्रिकेटमधील एका पर्वाचा अस्त झाला. त्याची धावांची भूक, चिकाटी व जिद्द कौतुकास्पद होती. 'टिट फॉर टॅट'साठी तो प्रसिद्ध होता. विराट कसोटीतून निवृत्त झाला असला तरी चाहत्यांच्या मनात तो कायम राहील. रोहित आणि विराट निवृत्त होण्यामागे कोच गौतम गंभीरचा हात आहे, अशी चर्चा आहे.

या संबंधी कोणताही पुरावा नसला तरी गौतम गंभीरची रणनिती, नव्या संघबांधणीची त्याची मनीषा यामुळे तो अप्रत्यक्षरित्या दोन दिग्गजांच्या निवृत्तीमागचे कारण असावे, असे बोलले जाते. भारतीय संघात स्टार क्रिकेटपटूंचा भरणा होता त्यामुळे कोचचे फारसे काही चालायचे नाही. गंभीरला हे 'स्टार कल्चर' संपवायचे होते, असे बोलले जाते. याला हवा देणा-या काही गोष्टी घडल्या. गौतम गंभीरची कोचपदी नियुक्ती झाल्यानंतर १०० कसोटींचा अनुभव असणा-या ऑफस्पीनर आर. अश्विनने निवृत्ती स्वीकारली. आता रोहित आणि विराटने निवृत्ती जाहीर केली तर अष्टपैलू रवींद्र जडेजाही निवृत्तीच्या मार्गावर असल्याची चर्चा आहे. एकूण प्रकार खरा असेल तर भारतीय क्रिकेट रसातळाला जाईल यात शंका नाही. सध्या भारतीय क्रिकेटमध्ये एकाहून एक दर्जेदार नवोदित क्रिकेटपटूंचा असलेला भरणा पाहून जगभरात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. क्रिकेट मंडळाच्या अथक परिश्रमांमुळे आणि दूरदर्शीपणामुळे भारतीय क्रिकेटने हे ऐश्वर्य प्राप्त केले आहे, त्याला दृष्ट लागू नये हीच अपेक्षा.

# खुलेआम चालवितो मटका

## चर्चा:गणेश खराडेंवर कारवाई का नाही?




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यात गणेश खराडे नावाच्या व्यक्तीने मटका बुक्यांचा सुळसुळाट केला तरी सुद्धा त्यांच्यावर कारवाई केली का जात केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक पाटील साहेब गणेश खराडे नावाच्या व्यक्तीवर कारवाई करण्यासाठी काय बक्षीस द्यावे लागेल असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण गणेश खराडे नावाच्या व्यक्तीने केज तालुक्यात नव्हे तर कुठे कुठे मटका बुक्यांचा सुळसुळाट केला आहे हे जनतेला सुध्दा आणखी माहिती नाही तरी सुद्धा प्रशासन कुठल्याही प्रकारची कार्यवाही गणेश खराडे नावाच्या व्यक्तीवर करत नाहीत हा प्रकार नेमका कोनता आहे का गणेश खराडे नावाच्या व्यक्ती कडून काही लाचलुचपत केली जात आहे असाही प्रश्न नागरिकांना पडला आहे तरी गणेश खराडे नावाचा व्यक्तीला कुठल्याही प्रकारची भीती नाही कारण त्यांच्या वर कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली जात ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे तरी गणेश खराडे वर कारवाई कधी होणार असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.


## पान एक वरून


**'त्या' आपहरण प्रकरणी**

येत होते. पोलीस दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने सर्व बाबींची पडताळणी करत होते. या तपासादरम्यान नविनच ट्विस्ट समोर आला, हे मुळात आपहरण नव्हतेच तर ही पोलीस कारवाई होती हे समोर आले आहे.

**तेलंगणातील काय आहे नेमकं प्रकरण?:** तेलंगणामधील कुकटपल्ली कॉलेजमधील दोन विद्यार्थ्यांना शहरात २.७ किलो गांजा वाहतूक करताना अटक करण्यात आली होती. महाराष्ट्रातील परळी येथून हैदराबादला ९१,००० रु. किमतीचा २.७किलो गांजा वाहतूक करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना बालानगर स्पेशल ऑपरेशन्स टीम (एसओटी) ने मियापूरमधील हाफिजपेट रेल्वे स्टेशनवर अटक केली. २० वर्षीय पतिबाला वेंकट सत्यनरसिंह स्वामी आणि २३ वर्षीय गद्दी दीपक अशी आरोपींची नावे आहेत. दोघेही कुकटपल्ली येथील सिद्धार्थ डिग्री आणि पीजी कॉलेजचे विद्यार्थी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोघांनी परळी येथील गांजा पुरवठादार एमडी अमजदकडून हा अवैध पदार्थ खरेदी केला होता आणि तो ट्रेनने हैदराबादला पोहोचवला होता. मियापूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. अमजद आणि ड्रग्ज पुरवठा नेटवर्कमधील पुढील संबंधांचा शोध घेण्यासाठी प्रयत्न केले. या अनुषंगानेच परळीतील अमजद यास तेलंगणा पोलीसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबवून ताब्यात घेतले.

**मान्सून वाऱ्याच्या वेगाने**

अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरतानाच शेतक-यांनी थोडासा माहिती तंत्रज्ञानाची जोड घेण्याची गरज आहे. जेणेकरून पावसाचा खंड आणि पावसाचे वितरण शेतक-यांना मोबाइलवर शक्य आहे. हवामान विभागाचा मानस प्रत्येक गोष्ट शेतक-यांपर्यंत पोहोचविणे हा आहेच. मात्र संपूर्ण चार महिने पाऊस कसा असेल? हे सांगता येत नाही. कारण, पावसाचे टप्पे असतात. जून महिना हा संक्रमणाचा काळ असतो. जुलै आणि ऑगस्ट हे दोन महिने महत्त्वाचे असतात. त्यामुळे शेतक-यांनी हवामान विभागाशी संपर्क राहून शेतीचे नियोजन केले पाहिजे.यंदा पाऊस चांगला आहे ही चांगली बाब आहे. तसे पूर्वानुमान आहेच. मात्र, ते शेतक-यांपर्यंत कधी कधी पोहोचत नाही, ही वस्तुस्थिती असली तरी शेतक-यांनी स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांवर अवलंबून राहण्यापेक्षा आयटीची जोड घेत शेतीचे नियोजन करणे गरजेचे आहे. दरम्यान, आता मान्सून मॉड्यूलनुसार, यंदा मान्सून जून महिन्याच्या अखेरपर्यंत राज्य व्यापले, असा अंदाज आहे. शिवाय यंदाच्या मान्सून अल निनो नाही. ला निना आता न्यूट्रल झाला आहे. या सगळ्या गोष्टी तटस्थ असल्या तरी ग्लोबल मॉड्यूल असे दर्शवित आहेत की पावसाचे चार महिने चांगले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शेतक-यांना दिलासा :** यंदा राज्यातील शेतक-यांना चांगल्या पावसाचा आधार आहे. शेतक-यांनी हवामान विभागाकडून माहिती घ्यावी. दिशाभूल करणारी माहिती घेऊ नये. शेतीच्या कामासाठी आयटीची जोड घ्यावी. यंदाचा मान्सून शेतक-यांसाठी फलदायी ठरेल, ही शक्यता नाकारता येत नाही. विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील शेतक-यांना निश्चित यंदा चांगला पाऊस असून तो फास्ट ट्रेनसारखा असणार आहे यात तिळमात्र शंका नाही.

**आज उपमुख्यमंत्र्यांचा**

वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी १०.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ११.३० वाजता श्री. राजकिशोर मोदी यांचे निवासस्थान, गुरुवार पेठ, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ११.३० ते १२.३० राखीव.दुपारी १२.४५ वाजता कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील हेलिपॅड येथे आगमन. दुपारी १२.५० वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. दुपारी १.१५ वाजता पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. नंतर मोटारीने प्रयाण. दुपारी १.२० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन. दुपारी १.३० वाजता बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक. दुपारी ३.३० वाजता बीड जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व सन २०२५-२६ आढावा बैठक. सायं. ४.३० वाजता बीड जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक. नंतर पत्रकार परिषद. त्यानंतर मोटारीने गेवराईकडे प्रयाण.सायं ७.०० वाजता कृष्णाई निवास, जुन्या बस स्टँड समोर, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.०० वाजता राखीव . नंतर मोटारीने प्रयाण. सायं ७.३० वाजता आर.बी. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.३० वाजता विविध विकास कामांचा शुभारंभ. नंतर राखीव. रात्री ९.४५ वाजता मोटारीने छत्रपती संभाजीनगर कडे प्रयाण.

**दिवटे, कुटुंब माझ्या**

मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे यांच्याकडून माहिती घेतली. शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, सुरज ला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा कॉ चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते.

**परळी-गंगाखेड हायवे पुलाचे**

पूर्ण करावे अशी मागणी करण्यात येत आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते मनोज संकाये यांनी अनेकवेळा महामार्गाच्या अधिकाऱ्यांना निवेदने दिले असून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. तरी हा वाद मिटवून रखडलेल्या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

**मराठा संघटनांची बंदची**

मान्य मान्य होणार नाहीत तोपर्यंत मागे हटणार नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.आरोपींवर कठोर कारवाई करा व्हीडीओ आहेत फोटो आहेत. आरोपी हे त्यांचे समर्थ आहेत असे म्हणत वाल्मिक कराड यांचे नाव न घेता सुरेश धस यांनी निशाना साधला. तसेच आरोपींवर कठोर कारवाई करा, अशी मागणी देखील धस यांनी केली आहे. दरम्यान ते आज आंबेजोगाईला जात शिवराजची भेट घेणार असल्याची माहिती आहे.

**जातीय रंग नको :** बीडचे पोलिस अधिक्षक नवनीत कावत यांनी आवाहन केले आहे की, या प्रकरणाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न करू नका. २० जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत त्यामध्ये विविध जातीचे आरोपी आहेत.एकाच जातीचे नाहीत. तत्कालीन कारणामुळे वाद झाला होता. जातीय रंग देऊ नये आणि सोशल मीडियावर प्रक्षोभक पोस्ट करू नये.


## पान सहा वरून


**जायकवाडी उजव्या कालव्याला**

जायकवाडी प्रकल्प टप्पा २ ला मंजुरी दिली होती. कालव्यावर १३२ किलोमीटर लांबीच्या कालव्याचे अस्तरीकरण आधुनिक तंत्रज्ञान वापरून करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जलसंपदा विभागाने मार्च महिन्यात या कामाला सुरुवात केली. आज १३२ कि.मी. पैकी १०५ किमी (८०%) कामे पूर्ण करण्यात आल्याची माहिती परभणी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद लांब यांनी दिली आहे. या कामामुळे चालू उन्हाळी हंगाममध्ये सिंचन आवर्तनामध्ये ऐतिहासिक यश प्राप्त झाले आहे. प्रकल्पाच्या स्थापनेपासून प्रथमच, पैठण उजव्या कालव्यातून १६०० क्युसेस एवढ्या प्रचंड क्षमतेने विसर्ग यशस्वीरीत्या चालू आहे. यापूर्वी एवढा विसर्ग माजलगाव धरणामध्ये कधीच पोहोचला नाही. चालू हंगामध्ये अंतिम टप्प्यात आणखी पूर्ण विसर्ग क्षमतेने २२५० क्युसेस करण्याचे नियोजन 'कडा' करीत आहे. गोदावरी महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता जयंत गवळी, कार्यकारी अभियंता प्रसाद लांब आणि अन्य अधिकाऱ्यांनी यासाठी पाठपुरावा केल्याने हे शक्य झाल्याचे दिसून येते.

**पावसाळ्याच्या तोंडावर**

पावसाळ्यात शहरात साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी कामाच्या वेळेसंदर्भात नाराजी व्यक्त केली आहे. हे काम चार महिने आधी करायला हवं होतं, आता पाऊस आला तर चिखल व दुर्गंधीमुळे त्रास होईल, असं म्हणत अनेक नागरिकांनी सोशल मीडियावरही संताप व्यक्त केला आहे. काम वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहोत. नागरिकांनी संयम ठेवावा, हे काम भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी आवश्यक आहे, अशी माहिती नगरपंचायतीच्या एका अधिकाऱ्याने दिली.

**माजलगावमध्ये तिरंगा रॅली**

अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी गोविंद बजाज प्रकाश दुगड शशीकिरण गडम अभय कोकड , बंडू खांडेकर, रूपालीताई कचरे डॉ. अभिजीत सोळंके माऊली सरवदे प्रल्हाद दळवे शरद कचरे आनंत कुलकर्णी निरंजन वाघमारे सत्यनारायण उनवणे विनायक रत्नपारखी ईश्वर खुरपे अविनाश कांडुरे पांडुरंग झोडगे उमेश जाधव राम शिंदे नवनाथ गायकवाड सुभाष साळवे सुभाष कांबळे खय्यम पठाण कल्याण शेप पवन मोगरेकर रमेश शेंडगे मनोज कोरडे नामदेव मुळे यांच्यासह भारतीय जनता पार्टी, शिवसेना ,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक महिला यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. रॅलीत सहभागी सर्वांनी तिरंगा ध्वज हातात फडकवत या रॅलीने शहरवासी यांचे लक्ष वेधले. आंबेडकर नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीचा समारोप करण्यात आला.

**शिक्षक जुन्या पेन्शनपासून**

शिक्षणाधिकारी फुलारी यांनी दिला होता. पण त्या गोष्टीचा त्यांना पूर्णपणे हरताळ केला आहे. संघटनेच्या वतीने वारंवार पाठपुरावा केला जात असून त्यावर कोणत्याही प्रकारची दखल न घेता शिक्षकांना अरेरावीची भाषा केली जाते. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री पद स्वीकारल्यापासून वाटले होते प्रशासन गतिमान आणि नितिमान होईल पण असे होताना असे दिसून येत नाही. तब्बल १८ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लाभ मिळणार होता मात्र जिल्हा परिषदेच्या उदासीनतेमुळे आणि हुकूमशाही मुळे आशा धूसर होत आहे. सदरील प्रश्नाकडे बीडचे पालकमंत्री या नात्याने का होईना ना. अजित पवार यांनी लक्ष घालावे यासाठी संघटनेच्या वतीने सोमवारी पालकमंत्र्यांना निवेदन देण्यात येणार आहे. असे जिल्हाध्यक्ष विष्णू आडे आणि पात्र शिक्षक यांनी प्रसिद्धी पत्रकातून कळविले आहे.

**हेरगिरी प्रकरणी युट्यूबर ज्योती**

श्रीनगर आणि पहलगाममध्ये गेली होती. त्यानंतर मार्च महिन्यात ती पाकिस्तानात गेली होती. २०२३ साली ती पाकिस्तानच्या उच्चायुक्तालयामध्ये गेली होती. पाकिस्तानला जाण्यासाठी तिला व्हिसाची गरज होती. त्या ठिकाणी दानिश या अधिका-याशी ओळख झाली आणि नंतर त्यांचा मोबाईलवर संपर्क वाढला. ज्योतीच्या चौकशीतून असे दिसून आले आहे की, ती पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या संपर्कात होती. ज्योतीने संशयास्पद कारवाया करून आणि शत्रू देश पाकिस्तानच्या एका नागरिकासोबत भारतीय गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करून भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आणण्याचा गुन्हा केला आहे. त्यामुळे त्याला भारत सरकारने हेरगिरीच्या आरोपाखाली पर्सोन-नॉन-ग्राटा घोषित केले आहे.

**दानिशशी संपर्कात राहून देशविरोधी माहिती दिली** : भारतात परतल्यानंतर ज्योती स्नॅपचॅट, व्हॉट्सअ‍ॅप आणि टेलिग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे या लोकांशी संपर्कात राहिली आणि देशविरोधी माहिती देऊ लागली. या काळात ती पाकिस्तान उच्चायुक्तालयातील अधिकारी दानिश यांच्या सतत संपर्कात होती. ज्योती मल्होत्रा पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या संपर्कात असल्याचे समोर आले.

**शिवसंग्राम सदस्य नोंदणीस**

करण्यात आला. समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांचा सदस्यता नोंदणीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. आगामी काही दिवसात पन्नास हजार प्राथमिक सदस्य आणि दहा हजार सक्रिय सदस्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शिवसंग्रामचे संस्थापक लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी शिवसंग्राम चे पदाधिकारी, कार्यकर्ते जिल्हा ,तालुका, सर्कल आणि गावोगावी काम करत आहेत. असे प्रतिपादन याप्रसंगी डॉ. ज्योती मेटे यांनी केले.यावेळी यावेळी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे, शहराध्यक्ष सुहास पाटील,उपाध्यक्ष सचिन कोटुळे, तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, पंचायत समिती मा. सभापती ज्ञानेश्वर कोकाटे,संचालक सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, धर्मराज मागदे सर, सुनील शिंदे, राजेंद्र आमटे , कचरू महाराज कदम, राजेश्वर सातपुते, मा. पं. स.सदस्य किशोर काळकुटे, सरपंच सोमनाथ पवार,उपसरपंच चद्रकांन्त कोसले, कृष्णा भागडे, श्रीराम घोडके, जीएस चौधरी, अजिंक्य जगदाळे, जगन्नाथ घोडके ,महारुद्र वाणी, शेख नासिर, संतोष चौधरी, गणेश चौधरी, विशाल रसाळ, सखाराम काळकुटे, जालिंदर सावंत, गणेश कदम ,अमोल सावंत, कृष्णा सावंत ,सुभाष काळकुटे, दत्ता जगदाळे, गणेश जगदाळे ,अतुल बडगे ,सतीश कागदे आदी उपस्थित होते.

**डॉक्टर होण्यासाठी त्याग**

सेवेमधून मिळते, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा. आर. एस. यादव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. किशोर भोपळे, डॉ. गणेश आगे, डॉ. दिन कर मस्के, डॉ. श्रेयश देशपांडे, डॉ. लक्ष्मीकांत यादव, डॉ. प्रताप लेंडाळ, डॉ. भानुदास रासवे, डॉ. प्रज्ञा खेत्री,डॉ महेश कटारे, डॉ. सारीका कटारे, प्रा. आर. एस. यादव, माजी. सरपंच अविनाश गोंडे, विष्णु खेत्री, दत्ता चव्हाण, माजी जि.प. सदस्य शिवप्रसाद खेत्री, श्री हभप शिवदास महाराज जंगले,वसंतराव रणखांब, माऊली खेत्री. यांची प्रमुख उपस्थीती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमेश्वर हिवरकर यांनी केले तर आभार सुरेश खेत्री यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिलीप खेती, अंकुश खेत्री, भिमराव जंगले, लक्ष्मण खेत्री,. अशोक जंगले, दामोधर खेत्री यांनी विशेष परिश्रम घेतले.

**कंटेनर चालकासह मालकावरही**

मद्यधुंद कंटेनर चालकाने त्याच्या ताब्यातील कंटेनर क्र. (डी डी ०१/झेड ९७७१) ने केज मध्ये जोराची धडक दिली या अपघातात मीना प्रवीण घोडके रा. टाकळी तालुका केज हिचा जागीच मृत्यू झाला. तर याच रस्त्यावर त्या कंटेनर चालकाने अनेक रिक्षा, मोटार सायकल आणि कार यांना धडक दिल्याने वीसजण जखमी झाले होते. दरम्यान अपघातातील मयत महिला मीना प्रवीण घोडके यांचे दीर सचिन घोडके यांच्या तक्रारीवरून कंटेनर चालक मुजफर युसुफ सय्यद (रा. पंचवटी लातुर ता. जि. लातुर) आणि कंटेनरचा मालक रोहीत विजेंद्र शर्मा (रा. वापी, गुजरात) यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान कंटेनर चालक हा अपघाता नंतर कंटेनर २५ कि.मी. अंतरावर पलटी झाल्याने किरकोळ जखमी झाला होता. तो पोलिसांच्या ताब्यात असून त्याच्यावर अंबाजोगाई येथील सरकारी दवाखान्यात उपचार सुरू आहेत. त्याला सुट्टी होताच पोलीस त्याला अटक करणार आहेत. पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक आनंद शिंदे हे तपास करीत आहे.

**कामगार संघटनेचे चौथे**

मागण्यासाठी संघटना मजबूत करून , संघर्ष करून मागण्या मान्य करून घेतल्या पाहिजेत . या वेळी तालुका सचिव यांनी मागिल ती वर्षाचा कार्याचा लेखी अवहाल सभागृहा समोर मांडला त्याच्यावर चर्चा होऊन एक मताने मंजूर करण्यात आला .यावेळी पुढील तीन वर्षासाठी अध्यक्ष म्हणून विनायक पौळ तर सचिव म्हणून अशोक पोपळे .यांची निवड करण्यात आली.

**परळीतील गुंडगिरीवर कठोर**

जखमी झालेल्या रुग्णांचीही भेट घेतली. डॉक्टरांशी चर्चा करून सगळ्यांना योग्य ती वैद्यकीय मदत मिळतेय ना, याची खातरजमा केली. यावेळी बोलताना खा.सोनवणे म्हणाले, परळी व परिसरात दहशतीचा धंदा निर्माण करण्याकडे नवतरुणांचा कल वाढत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे थांबवायचे असेल तर कायद्याचे राज्य स्थापण होणे गरजेचे आहे. या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एक स्वतंत्र आयपीएस अधिकारी नेमण्यात यावा, परळीतील सर्वच वादग्रस्त पोलिस अधिकारी यांच्या तातडीने बदल्या कराव्यात, ऋशिवराज दिवटे प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोरात कठोर शासन करावे, अशा मागण्या राज्यसरकारकडे करत आहे. तर दिवटे परिवाराला पोलिस संरक्षण देण्यात यावे. त्यांना रूग्णालयातही धमकावण्याचे काम सुरू आहे. त्याकडे पोलीस प्रशासनाने गांभिर्याने पहावे अशी मागणी केली. राज्य सरकारकडे करण्यात आलेल्या मागण्या आज संध्याकाळपर्यन्त मान्य कराव्यात, अन्यथा बीड जिल्हा उद्या बंद करण्यासाठी जिल्हा बंदची हाक देण्यात येईल, असा इशाराही यावेळी खा.सोनवणे यांनी दिला. याच बरोबर बीड जिल्ह्यामध्ये जे चाललंय ते अत्यंत दुर्दैवी आहे. बीड जिल्ह्यात अनेक घटना घडतात की या गुन्ह्यांची पाळेमुळे परळीतील विशिष्ठ लोकांच्याकडे सापडतात. अतिशय वाईट कृत्य करणारे तरुण परळी शहरात आणि परिसरात तयार होत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. स्व. संतोष देशमुख यांचे ज्या दिवशी अपहरण आणि मर्डर झाला त्या दिवसापासून मी संसदेत व बाहेर आवाज उठवत आहे. सर्व आमदार आणि सामाजिक कार्यकर्ते बोलत आहेत, मात्र या गुंड प्रवृत्तीला रोखण्यासाठी पोलिसांनी क्रियाशील पुढाकार घ्यायला हवा, असेही खा.सोनवणे म्हणाले.

परळी पॅटर्नसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आयपीएस लेव्हलचा एक विशेष अधिकारी नेमण्यात यावा अशी मागणी करणार आहे.परळी मध्ये १९९२ पासून सत्तेने मस्तावलेली प्रवृत्ती आहे. सत्तेचा राजाश्रय मिळत असल्याने हे लोक दादागिरी आणि गुंडगिरी करीत आहेत.

**चिंचोली माळीत अडचणीत**

कारवाई करण्यात यावी व चौक दुसऱ्या जागेवर उभारला गेला पाहिजे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे कारण गावकऱ्यांनी पन सप्ताहाला अडचण निर्माण होते आहे अतिक्रमण केले आहे तेही अतिक्रमण हटविण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.


संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## भाईंदरच्या इंद्रलोक परिसरातील रस्ता खचला

**भाईंदर :** शनिवारी सकाळी अवकाळी पाऊस सुरू झाल्यानंतर भाईंदरमध्ये एक दुर्घटना घडली आहे. भाईंदर पूर्वेकडील इंद्रलोक भागातील एका खासगी विकासकाचे काम सुरू असलेल्या इमारती जवळील रस्ता खचल्याची मोठी दुर्घटना घडली आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी विकासाच्या कामावर परिसरातील स्थानिक नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. खचलेल्या रस्त्यावर एक मोठी खासगी शाळा आहे. शाळेला सुट्टी असल्याने विद्यार्थ्यांची गर्दी तसेच लोकांची वर्दळ नसल्याने मोठी दुर्घटना टळली आहे. महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळाला भेट दिली असून सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे.

### वेचक

## भाईंदरमध्ये शुद्ध पाणी सुविधा केंद्राचे उद्घाटन



**भाईंदर :** उन्हाळ्यात सामान्य लोकांना शुद्ध पिण्याचा पाणीपुरवठा करण्यासाठी टीएसएल फाऊंडेशनच्या एचएसबीसी इंडियाच्या सहकार्याने भाईंदर येथील आयडियल पार्क भागात सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण महापालिका उपायुक्त प्रसाद शिंगटे यांच्या उपस्थितीत आमदार नरेंद्र मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. या मोहिमेत आतापर्यंत ८० हून अधिक केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. अधिक लोकसंख्या असलेल्या सार्वजनिक ठिकाणी मोफत आणि सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्याच्या उद्देशाने सामुदायिक विकास उपक्रमाचा एक भाग म्हणून गेल्या तीन वर्षांत एचएसबीसी जल प्रकल्पांतर्गत संपूर्ण भारतात ८० हून अधिक केंद्रे उभारण्यात आली आहेत, ज्यामुळे दरवर्षी १२ लाखांहून अधिक लोकांना फायदा होत आहे. स्वच्छ पाण्याची उपलब्धता ही केवळ सार्वजनिक सेवा नसून एक सामाजिक जबाबदारी आहे. अशी भावना आमदार नरेंद्र मेहता यांनी व्यक्त केली. या उद्घाटन प्रसंगी महापालिकेचे उपायुक्त प्रसाद शिंगटे, एचएसबीसी इंडियाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एक हजाराहून अधिक लोकांना याची सेवा मिळणार आहे.

## नागप्पनला दहावीत ९९.२ टक्के गुण

**नवी मुंबई :** कोपरखैरणे येथील रिलायन्स फाऊंडेशन शाळेचा विद्यार्थी नागप्पन एन. याला सीबीएसई बोर्डाच्या दहावी परीक्षेत ९९.२ टक्के गुण मिळाले आहेत. त्याला ५०० पैकी ४९६ गुण मिळाले. सीबीएसईने २०२४ मध्ये घेतलेल्या आर्यभट्ट गणित चॅलेंजमध्येही तो



पुणे विभागात पहिल्या शंभर विद्यार्थ्यांमध्ये आला होता.

क्वीन्स कॉमनवेल्थ २०२४ निबंध स्पर्धेतील पस्तीस हजार मुलांमध्ये देखील त्याची गोल्ड फायनली म्हणून निवड झाली होती. नागप्पन याने आपल्या या यशाचे श्रेय त्याला प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारे त्याचे शिक्षक आणि सावलीसारखे सोबत राहून आधार आणि प्रोत्साहन देणारे आपले पालक यांना दिले आहे. माझ्या शाळेने मला परफेक्ट तणावमुक्त शिक्षण वातावरण दिले. ज्या भागात मला काही पॉलिशिंग आहे असे वाटले त्या क्षेत्रात मी परिपूर्णता प्राप्त करेपर्यंत प्रयत्न केले. शिवाय सातत्याने प्रत्येक विषयाचा केलेला सराव यामुळे आपण हे यश मिळवू शकलो असेही त्याने म्हटले आहे.

# लालचौकी स्मशानभूमीत तत्काळ पावसाळी शेड उभारण्याची मागणी

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**



कल्याण पश्चिमेतील लालचौकी स्मशानभूमीत तत्काळ चार बर्निंग स्टँड तयार करून त्यावर पावसाळी शेड उभारावे. चार दिवसात हे काम सुरु न केल्यास केडीएमसी आयुक्तांच्या बिल्डिंग खाली उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते बाबा रामटेके यांनी केडीएमसी आयुक्त आणि पोलीस उपायुक्तांना दिला आहे.

शुक्रवारी केडीएमसी विरोधी पक्ष नेते दिवंगत दिनेश तावडे यांचे पार्थिवदेह लालचौकी स्मशान भूमी येथे नेण्यात आले होते. या प्रसंगी माजी मंत्री खासदार जगन्नाथ पाटील, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार संजय केळकर, माजी आमदार नरेद्र पवार, प्रकाश भोईर व अनेक मान्यवर पत्रकार उपस्थित होते. त्याच वेळी थोडा थोडा पाऊस सुरु झाला. सर्वांनी स्मशानाची असुविधा पाहून नापसंती व्यक्त केली. जोरात पाऊस सुरू झाला असता तर पार्थिव देह जाळने मुश्कील झाले असते कारण स्मशान भूमीचे काम सुरू असल्याने तात्पुरते जाळण्याचे दोनच स्टॅन्ड केलेले आहेत, त्यावर कोणतेही पावसाळी शेड उभे केलेले नाहीत.

दिवंगत दिनेश तावडे यांचे पार्थिव स्मशानात आणले गेले तेंव्हा प्रचंड गर्दी झालेली होती आणि त्याच वेळी पत्रकार सचिन सागरे यांच्या वडिलांचे पार्थिवदेह स्मशानाच्या गेट वर आले. दोन जाळण्याचे स्टँड जवळ जवळ असल्याने व गर्दी असल्याने जवळ जवळ एक तास सचिन सागरे यांच्या वडिलांचे पार्थिव देह ठेवलेली गाडी बाहेर उभी ठेवावी लागली. या बाबत अनेक पत्रकारांनी खेद व्यक्त केला.

विशेष म्हणजे या प्रसंगाच्या एक दिवस अगोदरच १५ तारखेला याच स्मशान भूमीच्या गैरसोई बाबत सर्व वर्तमान पत्रात बातम्या छापून आलेल्या आहेत. याची दखल महापालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने घेतली नाही. कार्यकारी अभियंता जगदीश कोरे, शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांच्या पर्यन्त या बातम्या पोहचल्या नाहीत का..? गेले साधारण वर्षभर या स्मशान भूमीचे धिम्या गतीने काम सुरू आहे.

कोणीही लक्ष द्यायला तयार नाही. त्यामुळे लालचौकी स्मशान भूमीत तात्काळ चार जाळण्याचे स्टँड तयार करण्यात यावे. जाळण्याच्या स्टँडवर पावसाळी शेड उभे करण्यात यावे. सुक्या लाकडांची चार महिने पावसाळ्यात पुरतील अशी सोय करण्यात यावी. स्मशान भूमीच्या कामाचा वेग वाढवावा. काम केव्हा सुरु केले व केव्हा पूर्ण करणार याच्या मुदतीचा, ठेकेदाराचा नावासह, कार्यकारी अभियंता यांचे नाव मोबाईल नंबर सह फलक (बोर्ड) लावण्यात यावा. २० मे पर्यंत या बाबत कोणतीही कामाची सुरवात न झाल्यास केडीएमसी आयुक्तांच्या इमारती खाली उपोषण सुरू करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते बाबा रामटेके यांनी दिला आहे.

## शहीद जवानांना पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

भारत-पाकिस्तान तणावपूर्ण युद्धविरामानंतर राणी लक्ष्मीबाई उद्यान कल्याण पश्चिम येथे २१ ऑगस्ट २००६ साली जम्मू-काश्मीर येथे कर्तव्य बजावत असताना वीरगती प्राप्त झालेले कल्याणचे भारतीय सैन्यदलाचे जिगरबाज शहीद जवान निलेश मधुकर संगपाळ यांच्या स्मारकाजवळ युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या सर्व शहीद जवानांना बालरंगभूमी परिषद कल्याण शाखा यांच्या वतीने पुष्पचक्र व पुष्प वाहून शौर्यपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी बाल कलावंत, विद्यार्थी, पालक, शिक्षक, रंगकर्मी कल्याण शहरातील ज्येष्ठ नागरिक तसेच अनेक सिने-नाट्य कलावंत आणि बालरंभूमी परिषद कल्याण शाखेचे कार्यकारिणी व सर्व सभासद-सदस्य मोठ्याप्रमाणात आवर्जून उपस्थित होते.

यावेळी बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेचे प्रमुख कार्यवाह शिवाजी शिंदे यांनी शहीद जवान निलेश संगपाळ यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या देशसेवेला सलाम करत सर्व वीरगती प्राप्त झालेल्या शहीद भारतीय जवानांना जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

कार्यक्रम प्रसंगी अभिनेते-गायक रमेश जाधव, जे.पी.सिंग व त्यांच्या संपूर्ण समूहाने देशभक्तीपर गीते सादर करून सर्व शहीद जवानांना मानवंदना दिली.

अन्यथा नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

## आदिवासी भागात पावसाळ्यापूर्वी संरक्षण कठडे बांधा



◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

मुरबाड तालुक्यातील आदिवासी भागात असलेल्या न्याहाडी, चासोळे व हेदवली पुलावर पावसाळ्यापूर्वी तत्काळ संरक्षण कठडे (लोखंडे रेलिंग) बांधण्याची मागणी परिसराच्यावतीने सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पवार व सहकारी यांनी एका निवेदनाद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे.

न्याहाडी, चासोळे व हेदवली पुलावर कठडे नसल्याने पावसाळ्यात व इतर वेळी सतत अपघात होत असतात. वाल्हीवरे, न्याहाडी, मेर्दी व खुटल ग्रामपंचायत मधील आदिवासी वाडे-पाड्यामधील मोठ्या प्रमाणात नागरिक चासोळे व न्याहाडी पुलावरून ये-जा करीत असतात

या वरील तिन्ही पुलांवर संरक्षण भिंत किंवा लोखंडे रेलिंग उभारण्यासंबंधीचे पत्र १३ जुलै २०२३ रोजी समाजसेवक प्रकाश पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांना दिले असताना आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. २४ एप्रिल २०२५ रोजी न्याहाडी पुलाला कठडे नसल्यामुळे फुलवा अन्सारी (बिहार रहिवासी) नावाचा युवक मोटार सायकलसह नदीत पडल्यामुळे त्याला आपला जीव गमवावा लागला. मागील पावसाळ्यात चासोळे पुलावरून सुद्धा जयेश आलम(चासोळे) व न्याहाडी पुलावरून खाकर दाम्पत्य (वाल्हिवरे) यांचा सुद्धा मोटार सायकल अपघात झाला होता. हेदवली पुलाची अवस्था तर फार दयनीय आहे. गावातील शाळकरी मुलांना पावसाळ्यात येताना तारेवरची कसरत करावी लागते. ग्रामस्थ व दूधवाले आपला जीव मुठीत धरून पुलावरून ये-जा करीत असतात. याला जबाबदार कोण? सार्वजनिक बांधकाम खात्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा का दाखल करू नये यासंबंधीची विचारणा संबंधित निवेदनात केली आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी हेदवली, चासोळे व न्याहाडी पुलावर संरक्षण कठडे न उभारल्यास करचोंडे, चासोळे, मेर्दी न्याहाडी व वाल्हीवरे या ग्रामपंचायतीमधील सर्व नागरिकांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग मुरबाड येथे उपोषण करून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाचे माजी चेअरमन प्रकाश पवार,जिल्हा परिषद ठाणेचे माजी सदस्य संजय पवार, आदिवासी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ खाकर सर, मेर्दी ग्रामपंचायत सरपंच पांडुरंग दरवडा, समाजसेवक अशोक पठारे व संतोष देशमुख या निवेदनकर्त्यांनी दिला आहे.

## टाटा कौशल्यवर्धन केंद्राचे आज भूमिपूजन

**कल्याण :** कल्याण शहरातील दावडी येथे टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड संचालित कौशल्यवर्धन केंद्र, सेंटर फॉर इन्व्हेंशन इनोव्होवेशन, इक्युबेशन अँड ट्रेनिंग सेंटरची उभारणी करण्यात येत आहे. कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या सहकार्याने सुमारे १९७ कोटी रुपयांच्या निधीतून हे केंद्र उभे राहणार आहे. टाटा टेक्नॉलॉजीज, इतर उद्योग संघ, एमआयडीसी व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचा हा संयुक्त उपक्रम आहे. केंद्राच्या माध्यमातून अत्याधुनिक प्रशिक्षण मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज रविवार १८ मे रोजी डोंबिवली पूर्वेतील सावळाराम महाराज क्रीडा संकुलाच्या मैदानात सायंकाळी ४.३० वाजता या प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न होणार आहे.

## महापालिकेच्या परिवहन बसला भीषण अपघात

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महापालिकेच्या परिवहन बसला भीषण अपघात झाला. या अपघातात चालकाच्या प्रसंगावधनामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी बसचे मोठे नुकसान झाले आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेच्या परिवहन सेवेची भाईंदर रेल्वे स्थानक ते चौक बस मार्ग क्रमांक १ ही बस भाईंदर वरून चौककडे गेली. रोजच्या प्रमाणे बस प्रवाशांनी पूर्णपणे भरलेली होती. चौक येथून उतरणीवर बस असताना अचानक ब्रेक नादुरुस्त होऊन लागत नसल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. बस चालकाने प्रसंगवधान साधून मोठ्या कौशल्याने वेग कमी करत बसवर ताबा घेत बस थांबवली; परंतु ती डिव्हायडरवर आदळली



गेली. अन्यथा ती उलटण्याची शक्यता होती. त्यामुळे मोठा अनर्थ घडला असता. सुदैवाने अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही. अपघातामुळे पुन्हा एकदा परिवहन सेवेच्या नादुरुस्त बसचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## आज तिन्ही रेल्वे मार्गांवर 'मेगा ब्लॉक'

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

रविवारी मध्य रेल्वे, हार्बर रेल्वे आणि पश्चिम रेल्वे मार्गावर विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे.

यामध्ये मध्य रेल्वेच्या ठाणे - कल्याण दरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी १०:४० ते दुपारी ०३:४० पर्यंत ब्लॉक घेण्यात येईल. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून सकाळी ९:३४ ते दुपारी ३:०३ पर्यंत सुटणाऱ्या अप आणि डाऊन जलद/सेमी-जलद लोकल ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान धिम्या मार्गावर वळवल्या जातील. या सेवा त्यांच्या संबंधित थांब्यांव्यतिरिक्त कळवा, मुंब्रा आणि दिवा स्थानकांवर थांबतील. तसेच सीएसएमटी/दादर येथून सुटणाऱ्या डाऊन मेल/एक्स्प्रेस ठाणे आणि



कल्याण स्थानकांदरम्यान पाचव्या मार्गावर वळवल्या जातील. तर अप मेल/एक्स्प्रेस कल्याण आणि ठाणे/विक्रोळी स्थानकांदरम्यान सहाव्या मार्गावर वळवल्या जातील.

हार्बर मार्गावर वडाळा रोड - मानखुर्ददरम्यान अप आणि डाऊन मार्गावर सकाळी ११ ते संध्याकाळी ४ पर्यंत ब्लॉक घेण्यात येणार असून, या काळात यादरम्यानच्या फेऱ्या बंद राहतील. या काळात पनवेल-मानखुर्द-पनवेल मार्गावर विशेष लोकल चालवल्या जातील. या काळात हार्बर मार्गावरील प्रवाशांना सकाळी १० ते संध्याकाळी ४:३० पर्यंत ट्रान्स हार्बर लाइन व मुख्य मार्गिकेवरून प्रवास करण्याची परवानगी आहे.

पश्चिम रेल्वेच्या वसई रोड आणि भाईंदर दरम्यानदेखील शनिवारी मध्य रात्री १२:३० ते रविवारी पहाटे ४:०० पर्यंत मेगा ब्लॉक घेण्यात येणार असून, या कालावधीत विरार/ वसई आणि बोरीवली/भाईंदर दरम्यान सर्व धिम्या लोकल जलद मार्गावर वळविण्यात येतील.

## 'मिशन १०० डेज' अंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेचा डंका

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

### विविध विभागांना राज्यस्तरीय पुरस्कार

"मिशन १०० डेज" या राज्यस्तरीय उपक्रमांतर्गत ठाणे जिल्हा परिषदेने उल्लेखनीय कामगिरी करत विविध विभागांनी उत्कृष्टतेची शिखरं गाठली आहेत. या मोहिमेतील कामगिरीच्या आधारावर ठाणे जिल्ह्याच्या विभागांना मानांकन मिळाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली १०० दिवस कृती कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. तसेच विजेत्या सर्व विभागांचे अभिनंदन घुगे यांनी केले आहे.

गटविकास अधिकारी, शहापूर -द्वितीय क्रमांक, तालुका वैद्यकीय अधिकारी, भिवंडी-तृतीय क्रमांक, बालविकास प्रकल्प अधिकारी, भिवंडी-प्रथम क्रमांक,

पशुधन विकास अधिकारी, शहापूर-तृतीय क्रमांक, गटशिक्षणाधिकारी, कल्याण-प्रथम क्रमांक

या उल्लेखनीय यशाबद्दल बोलताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे म्हणाल्या, "मिशन १०० डेज" अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील विविध विभागांनी केलेली ही कामगिरी कौतुकास्पद आहे. हे यश म्हणजे नियोजनबद्ध अंमलबजावणी आणि सेवाभाव यांचे प्रतिक आहे. सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देते."

## कल्याणकरांनी अनुभवला 'शून्य सावली दिवस'

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

सुभेदारवाडा कट्टा आणि आकाश मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने "शून्य सावली दिवस" या खगोलीय घटनेचे निरीक्षण करण्यासाठी कल्याणमधील सुभाष मैदान येथे शनिवारी दुपारी १२:३० च्या सुमारास एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आकाश मित्र मंडळाचे सदस्य आणि खगोल अभ्यासक विद्येश कुलकर्णी यांनी शून्य सावली दिवस म्हणजे काय, तो केव्हा येतो, का येतो, शून्य सावली क्षण केव्हा असतो, जगातील कुठल्या भागातून तो अनुभवता येतो याची माहिती सोप्या शब्दांत सांगितली.

त्याचबरोबर सूर्याची क्रांती, उत्तरायण-दक्षिणायन, कर्क वृत्त आणि मकर वृत्त, संपात दिन, सूर्याचा भासमान मार्ग म्हणजेच आयनिक वृत्त, वेलांतर अशा खगोलीय संकल्पना देखील समजावून



सांगितल्या. सूर्य रोज दुपारी बारा वाजता आपल्या डोक्यावर येतो असं बोली भाषेत आपण म्हणत असलो तरी सूर्य डोक्यावर म्हणजेच "झेनिथ" वर येणे म्हणजे काय आणि ते केव्हा होऊ शकतं तसेच प्रत्येक गावी दुपारी बारा वाजता मध्यान्ह होत नसून ती रेखांशाप्रमाणे कशी बदलते याची माहिती दिल्यावर उपस्थितांना विज्ञानाची किमया जाणून घेता आली.

त्याचबरोबर उपस्थितांना वर्तुळात उभं करून सावली पाहणं तसेच काचेवर पाइप ठेवून त्याची सावली बरोबर त्याच्या खाली कशी पडते ते दाखवणं असे सोपे प्रयोग देखील करण्यात आले. शून्य सावली या अद्भुत क्षणाच्या निरीक्षणाचा लाभ विद्यार्थीनी, लहान मुलांनी आणि नागरिकांनी घेतला. विद्यार्थ्यांनी कुतुहलात्मक प्रश्न विचारले त्यावर त्यांना समजेल, अशा सोप्या भाषेत उत्तरं देण्यात आली. ज्येष्ठ खगोल अभ्यासक हेमंत मोने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## मोफत नेत्र तपासणी शिबीर उत्साहात

**डोंबिवली :** मुंबईतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था सुमनालय फाऊंडेशनने नवदृष्टी सेवा संस्था श्री साई श्रद्धा वृद्धाश्रम, खिडकाळी यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचा लाभ एकूण २१ गरजवंतानी घेतला. त्यातील ४ ज्येष्ठांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची गरज असल्याचे दिसून आले आहे.

सुमनालय फाऊंडेशनच्या परिवारातील सदस्यांचा वाढदिवस आणि पुण्यतिथीनिमित्त १५ मे २०२५ रोजी सायंकाळी हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. मानसिक समस्यांनी ग्रस्त असलेल्या काही रुग्णांनीही याचा लाभ घेतला.

नायर सुपरस्पेशालिटी आय हॉस्पिटल आणि नवदृष्टि सेवा संस्थेचे संचालक डॉ. संतोष नायर, कुलकर्णी, शीतल करदेकर, विवेक वॉरियर यांच्या पूर्ण सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

## ह. भ. प. नामदेव महाराज हरड यांना जीवे मारण्याची धमकी

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

मुरबाड तालुक्यातील नागाव येथील रहिवासी आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू-सिख्ख महापरिषद उपाध्यक्ष तथा काशी विद्वत परिषद प्रभारी विश्वगुरु सन्मानित ह.भ.प.नामदेव महाराज हरड यांना काही जण दुसऱ्याची मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने वारंवार जीवे मारण्याच्या धमकी देत असल्याचा तक्रार अर्ज नामदेव महाराज हरड यांनी मुरबाड पोलीस स्टेशन येथे दिला आहे. हरड यांच्या मालकी हक्काच्या जमिनीवर नव्याने घराची दुरुस्ती करण्याचे काम केले जात आहे. याबाबत त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामसेवक लेखी अर्ज दाखल केला असता तत्काळ पाहणी करून वस्तुस्थिती पाहण्यासाठी ग्रामसेवक आले असता सामनेवाले घरात लपून बसले होते. त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना प्रतिसाद दिला नाही म्हणून ते निघून गेले. यानंतर लगेच संबंधितांनी हरड यांना शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

कामांचे स्वरूप पाहता हरड यांनी अनधिकृत बांधकाम करत असल्याचे ग्रामसेवक नागाव यांच्या निदर्शनास लेखी निवेदन दिले आहे सामनेवाले गुन्हेगारी प्रवृत्तीचे गावगुंड असून उद्या हे संतोष देशमुख सारखी अवस्था माझी देखील करू शकतात अशी भीती हरड यांनी व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी मुरबाड पोलिस स्टेशन अंतर्गत तक्रार अर्ज करत पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला असून सामनेवाले यांनी या घराचे काम त्वरित थांबवले पाहिजे व जीवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी हरड यांनी केली आहे.

फ्लेमिंगो बघण्यासाठी पर्यटकांचा अत्यल्प सहभाग

## स्थलांतरित पक्ष्यांच्या समृद्धीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

शहराच्या फक्त काही किलोमीटर अंतरावर असलेली ठाणे-ऐरोली-भांडुप खाडी दरवर्षी हिवाळा संपता संपता एक अत्यंत सुंदर आणि दुर्मीळ निसर्गचित्र साकारते. यात हजारो गुलाबी फ्लेमिंगो पक्ष्यांची गर्दी दिसून येते. हजारो किलोमीटरचा खडतर प्रवास करून स्थलांतरित पक्ष्यांचे हे थवे या परिसरात दाखल होतात. त्यांच्या आगमनाने निसर्गाची समृद्धता उजळते; परंतु या दृश्याकडे स्थानिक लोक, शाळा, पर्यटक आणि प्रशासन मात्र फारसे लक्ष देताना दिसत नाहीत.



ऐरोली खाडी परिसरात उभारलेली 'फ्लेमिंगो सेंच्युरी' ही जागतिक दर्जाची सुविधा जर्मन सरकारच्या सहकार्याने उभी राहिलेली आहे. येथे बोट सफारीद्वारे पर्यटक ७-१० किलोमीटर अंतरावर खाडीत फिरून पक्ष्यांचे निरीक्षण करू शकतात. सेंच्युरीतील माहिती दालनामध्ये फ्लेमिंगो, किंगफिशर, व्हेल, शार्क मासा अशा विविध प्राण्यांविषयी माहिती मिळते, त्यांचे आवाजही ऐकता येतात. बोट सफारी दररोज फक्त १ ते ४ वेळा होते आणि पर्यटकांअभावी ती अनेकदा रद्द केली जाते. रविवारी थोडी वर्दळ असली तरी आठवड्याभरात ठिकठिकाणी शांतता पसरलेली असते. फ्लेमिंगो व्यतिरिक्त, ब्लॅक ड्रोंगो, ब्राह्मणी स्टार्लिंग, किंगफिशर, ग्रे हेरॉन, ब्राह्मणी घार, ग्रीन व्हार्बलर असे अनेक स्थलांतरित आणि स्थानिक पक्षी खाडी परिसरात आढळतात. सागरी वनस्पती, मासे, कासव आणि जलचर प्राण्यांचा संपूर्ण परिसंस्था येथे कार्यरत आहे.

फ्लेमिंगो हे फक्त सुंदरच नाहीत, तर पर्यावरणाच्या आरोग्याचे संकेतही आहेत. त्यांचे थवे पाणथळ जागांमध्ये, खाडीच्या काठावर, आणि खारफुटीच्या परिसरात झुडुपांमध्ये दिसतात. त्यांची सामूहिक उड्डाणे, पाण्यावर उमटणारी प्रतिबिंबे-हे पाहणे म्हणजे एक अत्यंत आनंददायी आणि समाधानकारक अनुभव आहे; परंतु अनेकदा या दृश्यांचा आनंद घेणारे केवळ पक्षीप्रेमी, वन्यजीव छायाचित्रकार किंवा थोडेफार पर्यावरणप्रेमी असतात. स्थानिक नागरिक, शाळा-महाविद्यालये आणि पर्यटकांचा सहभाग अत्यल्प आहे. खरं तर शहराच्या इतक्या जवळ निसर्गाचा असा कोपरा आहे, हे अनेकांना माहीतही नाही.




ठाणे येथील राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक यांच्या भरारी पथकाने परराज्यातील भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य (गोवा राज्यात निर्मित) वाहतुकीवर कारवाई केली. (छाया : अशोक घाग)

# चीन, तुर्कीची पोलखोल...





स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

चार दिवस चाललेल्या घनघोर लढाईनंतर भारताने पाकिस्तान विरोधात सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर मोहीम स्थगित केले, पण त्याचवेळी पाकिस्तानने पुन्हा कुरापत काढली, तर पुन्हा मोहीम सुरू करण्याची भारताने धमकीही दिली. अण्वस्त्रांच्या ब्लॅकमेलिंगला भारत घाबरत नाही, यापुढे जर पाकिस्तानशी चर्चा झाली, तर ती फक्त पाकिस्तानव्याप्त काश्मीर व दहशतवादावरच होईल असेही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठणकावून सांगितले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेतला, म्हणूनच पाकिस्तान बचावले असेच म्हणायला हवे होते. आणखी चार दिवस ऑपरेशन सिंदूर चालले असते, तर पाकिस्तानमध्ये हाहाकार उडाला असता, असंतोष भडकला असता, अगोदरच घसरलेली अर्थव्यवस्था पूर्ण कोलमडून पडली असती आणि पाकिस्तानची वाटचाल आणखी नवीन विभाजनाकडे सुरू झाली असती.

भारताने शस्त्रसंधी हा शब्द वापरलेला नाही, भारताने ऑपरेशन सिंदूर स्थगित केले असे म्हटले आहे, याचा अर्थ पाकिस्तानप्रेरीत दहशतवादी कारवाया पुन्हा सुरू झाल्या, तर नव्या जोमाने ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू करण्यास भारत शस्त्रसज्ज आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या मध्यस्थीने भारत-पाकिस्तानमध्ये शस्त्रबंदी झाल्याचे दि. ९ मे रोजी जाहीर केले, दोन्ही देशांचे आभारही मानले व नंतर काही तासांतच भारताने ऑपरेशन सिंदूर तूर्त स्थगित केल्याचे जाहीर केले. या निर्णयानंतर दोन्ही देशांतून एकमेकांवर होणारे क्षेपणास्त्रांचे व ड्रोनचे हल्ले थांबले. सरहद्दीवरील गावात जनजीवन सुरळीत झाले. युद्ध आपणच जिंकले म्हणून दोन्ही देशांत लोकांनी रस्त्यावर येऊन जल्लोष केला. दोन्ही देशांनी चार दिवसांच्या घनघोर लढाईला युद्ध असे म्हटले नव्हते. मात्र लाईन ऑफ कंट्रोल व आंतरराष्ट्रीय सीमा रेषा ओलांडून दोन्ही देशांनी विमाने, क्षेपणास्त्रे व ड्रोनचा एकमेकांवर मारा केला हे दोन्ही देशांनी जगाला सांगितले. या युद्धात भारताची सरशी झाली हे मान्य करावेच लागेल आणि चीन व तुर्कीची जगात पोलखोल झाली हे सुद्धा जगाला दिसून आले. चीन आणि तुर्की हे दोन्ही देश भारताच्या विरोधात प्रत्यक्षात युद्धात उतरलेले नव्हते पण त्यांची शस्त्रे, विमाने, ड्रोन त्यांनी भारताच्या विरोधात पाकिस्तानला दिले होते. चिनी बनावटीची शस्त्रे ही कमी दर्जाची आहेत हे या युद्धात दिसून आले. चिनी शस्त्रांचा भारताच्या प्रतिकारापुढे निभाव लागला नाही. चिनी शस्त्रास्त्रांची कामगिरी निराशाजनक होती. त्यातही चीन व तुर्कीची शस्त्रे पाकिस्तानी सैन्याला नीट वापरता आली नसतील, तर त्यापेक्षा आणखी त्यांचे दुर्दैव काय असू शकते. या युद्धात पाकिस्तान, चीन व तुर्की या तिनही देशांची नाचक्की झाली. आपली शस्त्रास्त्रे उत्तम होती पण पाकिस्तानी सैन्याला नीट हाताळता आली नाही असे चीन आता म्हणतो आहे. चीनच्या खुलाशावर कोणताही देश विश्वास ठेवणार नाही. चीनने कोणताही दावा केला तरी त्यावर तो जगाला मान्य कसा होणार?

पाकिस्तानने चिनी बनावटीच्या एचक्यू १६ व एचक्यू ९ या डिफेन्स सिस्टीमच्या प्रणालीचा उपयोग केला. एचक्यू ९ ची १२५ किमी, तर एचक्यू १६ ची ५० किमी रेंज आहे. पण त्याचा लाभ पाकिस्तानला काहीच झाला नाही. भारताने सोडलेले ड्रोन किंवा क्षेपणास्त्रे चिनी सिस्टीम रोखू शकली नाही. भारतीय हवाई दलाने चिनी बनावटीची डिफेन्स सिस्टीम आपल्या हल्ल्यातून पूर्ण उद्ध्वस्त करून टाकली. चीनने पाकिस्तानला जेएफ १७ हे लढाऊ विमान दिले होते. पण तेही निरूपयोगी ठरले. पाकिस्तानने चार दिवसांच्या युद्धात वापरेली चिनी बनवाटीची शस्त्रास्त्रे भारताच्या सरहद्दीवर येण्यापूर्वीच निकामी झाली.

चीन हा भारताचा पूर्वीपासूनचा शत्रू आहे. तो आता पाकिस्तानचा मित्र देश आहे. सर्व परिस्थितीत आम्ही पाकिस्तानच्या बरोबर असू, असे चीनने जाहीरच केले आहे. पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची सर्वांत जास्त मदत चीनकडून मिळते. दुसरीकडे चिनी बनवाटीच्या वस्तूंनी भारताची बाजारपेठ मोठी व्यापली आहे, स्वस्तात मिळते म्हणून भारतीय लोक चिनी वस्तू खरेदीला प्राधान्य देतात व भारतीय बाजारपेठेच्या जीवावर चिनी अर्थव्यवस्था मोठी होते. भारताने चिनी बनावटीच्या वस्तूंवर निर्बंध लावले, तर चीनला भारत विरोधी भूमिका बदलणे भाग पडेल. पण आजवरच्या कोणत्याही सरकारने तसा प्रयत्न केला नाही. कैलास मानसरोवरला जाण्यासाठी भारतीय यात्रेकरूंना परवानगी मिळते हेच चीनचे भारतावर फार मोठे उपकार आहेत, अशी आपली मानसिकता आहे. चीन अर्थव्यवस्था व संरक्षण क्षेत्रात बलाढ्य आहे, चीनने भारताचा मोठा भू-भाग काबीज केला आहे तरीही आपण आरे ला, कारे म्हणू शकत नाही.

जगात सुमारे ५० इस्लामिक देश आहेत. पैकी तुर्की व अजरबैजान या देशांनी भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानला पूर्ण ताकदीने साथ दिली. तुर्कीने दिलेल्या ड्रोनचा भारतावर हल्ला करण्यासाठी पाकिस्तानने वापर केला. तुर्कीचे दिलेले पाचशे ड्रोन पाकिस्तानने भारताच्या दिशेने टाकले पण भारतीय सेनेने त्यांची वाटेत विल्हेवाट लावली. खरं तर भारताने तुर्कीशी संबंध चांगले ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केलाय. सन २०२४ मध्ये २ लाख ७५ हजार भारतीय पर्यटक तुर्कीला गेले होते, तर अजरबैजानला २ लाख ५० हजार भारतीय पर्यंटक गेले होते. २०२२ ते २०२४ च्या दरम्यान अजरबैजानला जाणाऱ्या भारतीय पर्यंटकांच्या संख्येत ६८ टक्के वाढ झाली. तुर्कीमध्ये पर्यटक साधारणतः आठवडा ते दहा दिवसांचा दौरा करतात, तर अजरबैजानला ४ ते ६ दिवसांचा पर्यटन दौरा असतो. अजरबैजानला भारतीय पर्यंटकांकडून हजार ते बाराशे कोटी मिळतात, तर तुर्कीच्या पर्यटनात भारतीय पर्यटकांचे तीन ते साडेतीन हजार कोटींचे योगदान आहे. भारतीय चित्रपटसृष्टीला तुर्कीचे आकर्षण आहे. तुर्की व अजरबैजानमध्ये २० हजारपेक्षा जास्त प्रत्यक्ष रोजगार पर्यंटनावर आधारित आहे, तर अप्रत्यक्ष पन्नास ते साठ हजार रोजगारांच्या संधी तिथे उपलब्ध आहेत. गेल्या चार वर्षांत आदरातिथ्य क्षेत्रातही मोठी गुंतवणूक तिथे वाढली आहे. भारतीय पर्यटकांच्या जीवावर तुर्की व अजरबैजानची अर्थव्यवस्था सुधारली आहे, पण हे दोन्ही देश भारताच्या विरोधात लढण्यासाठी पाकिस्तानला शस्त्रात्रे देण्यासाठी पुढे सरसावले हे अनाकलनीय आहे. तुर्कीला जाणाऱ्या हजारो भारतीय पर्यटकांनी विमानाची तिकिटे व तेथील हॉटेल बुकिंग रद्द केले आहे. तुर्कीहून येणाऱ्या सफरचंदावर मुंबई, पुणे, दिल्लीतील व्यापाऱ्यांनी बहिष्कार घालण्याचे जाहीर केले आहे. हा तर केवळ ट्रेलर आहे...

ऑपरेशन सिंदूर काळात भारताने बजावलेल्या कामगिरीनंतर भारताने वापरेल्या शस्त्रांस्त्रांबद्दल जगात विश्वसनीयता वाढली आहे. भारताच्या ब्रह्मोसने केलेल्या कामगिरीने सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले. ब्रह्मोसला जगातून मागणी वाढली तर भारताची अर्थव्यवस्था आणखी समृद्ध होऊ शकेल. रशियाने भारताचा मित्र म्हणून नाते कायम टिकवले आहे. रशियाने भारताला नेहमीच नवे तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे. अमेरिका नेहमीच अन्य देशांकडे सौदागर म्हणून भूमिका बजावत असते. पाकिस्तानबरोबर झालेल्या चार दिवसांच्या युद्धाच्या काळात रशिया व इस्त्रायल हे दोनच देश भारताच्या पाठिशी ठाम राहिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गेल्या अकरा वर्षांत सात-आठ डझन देशांना भेटी दिल्या असतील. पण युद्धकाळात बहुसंख्य देश भारताच्या समर्थनासाठी पुढे का आले नाहीत, याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. तुर्कीमध्ये जेव्हा भूकंप झाला तेव्हा भारताने ऑपरेशन दोस्त मोहीम राबवली होती. तुर्कीला वैद्यकीय मदत पाठवली. एडीआरएफची टीम पाठवली. दगड, मातीचे ढिगारे हलविण्यासाठी व गाडलेल्या लोकांना शोधून त्यांची सुटका करण्यासाठी भारताने मदत केली. भारताने तेव्हा तुर्कीला सहा विमाने भरून साधनसामग्री व वैद्यकीय मदत पाठवली होती. पण त्याची जाणीव न ठेवता तुर्कीने भारताशी लढण्यासाठी पाकिस्तानला शस्त्रे व सुरक्षा रक्षकही पाठवले हे आता उघड झाले आहे. तुर्कीमध्ये भूकंप झाला तेव्हा भारताने त्या देशाला भरघोस मदत केली. पण त्याच तुर्कीने युद्धकाळात पाकिस्तानला ड्रोन व शस्त्रे पुरवून भारताच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. तुर्कीचे अध्यक्ष रेसप तय्यीप एर्दोगन यांनी म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय नुकसानीचा विचार न करता, तुर्की-पाकिस्तानला मदत करीतच राहील. चांगल्या व वाईट काळात तुर्की सदैव पाकिस्तानबरोबर राहील... शस्त्रसंधी झाली म्हणजे युद्ध संपलेले नाही, भारताला पुन्हा दहशतवादाविरोधात व त्यांना मदत करणाऱ्या आकाच्या विरोधात मोठी सशस्त्र झेप घ्यावी लागणार आहे...

sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in

# नौदलात तीन-स्टार दर्जा मिळवणारी पहिली महिला





दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

पाकिस्तानात जन्मली. एक वर्षांची असताना भारत-पाकिस्तान फाळणी झाली. अत्यंत हालाखीची परिस्थिती पाहिली, अनुभवली. जिद्दीने परिस्थितीला सामोरे जात भारतीय सैन्यातील सर्वोच्च अधिकारी पदापर्यंत पोहोचली. प्रत्येक भारतीयांसाठी अभिमान वाटावा अशी ही महिला अधिकारी म्हणजे लेफ्टनंट जनरल पुनिता अरोरा.

फाळणीनंतर लेफ्टनंट जनरल अरोरा एक वर्षाच्या असताना भारतात आल्या. भारतात पोहोचल्यावर त्यांच्या कुटुंबाकडे फक्त एक ब्लँकेट आणि पाण्याचा तांब्या होता. फाळणीचा तो काळ भयानक होता. पुनिताच्या कुटुंबाप्रमाणे दहा लाखांहून अधिक लोकांनी भारतात स्थलांतर केले होते. या सगळ्यांनी तो कठीण काळ अनुभवला. पुनिताच्या कुटुंबाने शून्यातून सुरुवात केली. पडेल ती कामे केली. काबाडकष्ट केले. मुलांना शिकवले. हे कुटुंब एकत्र कुटुंब पद्धतीने राहत होते. तिचे बाबा भावंडांत मोठे होते. मात्र त्यांनी आपले भाऊ, बहीण त्यांचे कुटुंब यांची जबाबदारी देखील समर्थपणे हाताळली. अशा या एकत्र कुटुंब पद्धतीत पुनिता लहानाची मोठी झाली.

पुनिताचे सहारनपूरमधील सोफिया स्कूलमध्ये आठवीपर्यंत शिक्षण झाले. त्यानंतर गुरु नानक गर्ल्स इंटर-कॉलेजमध्ये शिकली. ११वीत असताना त्यांनी मुलांसाठी असणाऱ्या सरकारी शाळेत प्रवेश घेतल्यानंतर विज्ञानाला करिअर म्हणून घेण्याचा निर्णय घेतला. जेव्हा ती सहारनपूरमधील सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी गेली तेव्हा महाविद्यालयाने तिला सांगितले की ते फक्त मुलांसाठी आहे पण जर तिला आणखी दोन मुली मिळाल्या, तर तिला जागा मिळू शकते. तिने तसे केले आणि प्रवेश मिळाला. ती १९६२ मध्ये पुण्यातील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजमध्ये पदवीधर म्हणून रुजू झाली, पदव्युत्तर पदवी पूर्ण केली. त्या बॅचची ती टॉपर ठरली. ज्या महाविद्यालयात शिकली तिथे ती शिक्षिका म्हणून शिकवू लागली. कालांतराने कमांड हॉस्पिटलमध्ये पोस्ट झाली आणि पुढे कमांडंट म्हणून सर्वोच्च पदावर पोहोचली. आपल्या मुलीने डॉक्टर व्हावं ही पित्याची इच्छा पुनिताने पूर्ण केली.

आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज भारतातील प्रमुख वैद्यकीय महाविद्यालयांपैकी एक मानले जाते. पुनिता ज्यावेळेस या महाविद्यालयात शिकायला आली तेव्हा तिथे आवश्यक पायाभूत सुविधा नव्हत्या. तिथे वसतिगृह नव्हते. एका बॅरेकमध्ये २३ मुली असायच्या. आपल्याला येथे सर्वोत्तम शिक्षण मिळाले असे पुनिता म्हणतात.

पुनिता जानेवारी १९६८ मध्ये कमिशन मिळाले. भारतीय नौदलाच्या व्हॉइस ॲडमिरल होण्यापूर्वी त्या आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजच्या कमांडंट होत्या. २००४ मध्ये त्यांनी सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाच्या कमांडंटचा कार्यभार स्वीकारला आणि त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालयाचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी झाल्या. त्यापूर्वी त्या सशस्त्र दलांच्या वैद्यकीय संशोधनाचे समन्वय साधत होत्या. सशस्त्र दल वैद्यकीय सेवा (वैद्यकीय संशोधन) च्या अतिरिक्त महासंचालक म्हणून त्या लष्कराच्या मुख्यालयात सशस्त्र दलांच्या वैद्यकीय संशोधनाचे समन्वय साधत होत्या. एएफएमएसमध्ये एक सामायिक पूल असल्याने त्या सैन्यातून नौदलात गेल्या.

अंबाला येथे इंटर्नशिप केल्यानंतर एकवीस वर्षीय लेफ्टनंट पुनिता फतेहगड येथे आल्या. तोपर्यंत त्या बऱ्यापैकी मोठ्या शहरांमध्ये राहत होत्या. १९६८ मध्ये, फतेहगडमध्ये दरोडेखोरांचा वावर होता. त्यांनी यापूर्वी कधीही अशी जागा पाहिली नव्हती. प्रत्येकजण लाठी किंवा बंदूक घेऊन फिरत असे. मागे वळून पाहिल्यानंतर पुनिताला वाटते की यापेक्षा चांगली सुरुवात होऊ शकली नसती. या भागात जास्त रुग्णालये नव्हती. कोणतेही तज्ज्ञ डॉक्टर नव्हते. जवळचे मोठे रुग्णालय कानपूर किंवा लखनऊ येथे होते, जे चार ते सहा तासांच्या अंतरावर होते. त्या दिशेने जाणारी एकमेव ट्रेन मध्यरात्री निघायची. जर रुग्ण ट्रेन चुकला, तर डॉक्टरला त्याची काळजी स्वतः घ्यावी लागे. त्यामुळे पुनिताला डॉक्टर म्हणून खूप आत्मविश्वास मिळाला.

१९७१ ला जेव्हा पाकिस्तानशी युद्ध सुरू झाले, तेव्हा ती अजूनही फतेहगडमध्ये तैनात होती. याच दरम्यान तिचे लग्न झाले. तिचे पती देखील लष्करात डॉक्टर होते. ते श्रीनगरमधील बेस हॉस्पिटलमध्ये होते. ती तिच्या मुलाला जन्म देण्यासाठी या निसर्गरम्य शहरात आली होती. विमानतळावर ड्युटीवर असलेले तिचे पती बॉम्बहल्ला पाहत होते. पुनीताने जम्मू आणि काश्मीरमधील युद्धाची तयारी पाहिली. तेथील परिस्थिती तिच्या उत्तर प्रदेशातील तळापेक्षा पूर्णपणे वेगळी होती. फतेहगडला कधीही युद्ध दिसले नाही. लोकांना काय घडत आहे हे फारसे कळायचे नाही. ''तुम्ही तिथे [जम्मू आणि काश्मीरमध्ये] काय चालले आहे याची कल्पनाही करू शकत नाही. जर तुम्ही तिथे १५ दिवस घालवले, तर तुम्ही पूर्णपणे वेगळ्याच भावनेने परत याल.'' असं पुनिता म्हणते. सशस्त्र दल रुग्णालयांमध्ये प्रसूती एंडोस्कोपी आणि ऑन्कोलॉजी सुविधा स्थापन केल्याबद्दल पुनिता अरोरा यांना भारताच्या राष्ट्रपतींनी सेना पदक प्रदान केले. जम्मू येथील लष्करी रुग्णालयाचे नेतृत्व करताना त्यांच्या नेतृत्वाखाली कालू चक दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना कार्यक्षम आणि जलद उपचार दिल्याबद्दल त्यांना भारताच्या राष्ट्रपतींनी विशिष्ट सेवा पदक प्रदान केले. लेफ्टनंट जनरल पुनिता अरोरा या भारतातील पहिल्या महिला आहेत ज्यांनी भारतीय सशस्त्र दलाच्या दुसऱ्या सर्वोच्च पदावर म्हणजेच लेफ्टनंट जनरल पदावर आणि भारतीय नौदलाच्या पहिल्या व्हॉइस ॲडमिरल पदावर काम केले आहे.

पुनिता यांचे अवघे कुटुंब लष्करात आहे. पती ब्रिगेडियर पी. एन. अरोरा यांनी लष्करात त्वचारोगतज्ज्ञ म्हणून सेवा केली. मुलगा स्क्वाड्रन लीडर संदीप अरोरा देखील नवी दिल्लीतील एअर फोर्स बेस हॉस्पिटलमध्ये त्वचारोगतज्ज्ञ आहे. त्यांची पत्नीही डॉक्टर आहे. मुलगी सबीनाने साडेसहा वर्षांच्या नोकरीनंतर कनेक्टिकटमध्ये पदव्युत्तर पदवी मिळविण्यासाठी सैन्य सोडले. अशा या कुटुंबाचा प्रत्येक भारतीयास अभिमान वाटला पाहिजे. लेफ्टनंट जनरल पुनिता अरोरा यांची जीवनगाथा प्रत्येक भारतीयास प्रेरणा देणारी आहे. अशा महान व्यक्तीं पुढे 'लेडी बॉस' हा शब्द देखील खुजा ठरतो.

# सजग मराठी पालकांसाठी..



मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

लहानपणी चांदोबासारखे मासिक शाळेच्या वाचनालयात जाऊन वाचणे हा आमचा मधल्या सुट्टीचा आवश्यक भाग होता. त्यातल्या गोष्टी, रंगीत चित्रे हे सर्व आम्हाला अतिशय आवडायचे.

अलीकडच्या काळात वयमसारखे मासिक मुलांना आवडेल असे आहे. मराठीत मुलांच्या मासिकांची संख्या एकूण कमीच आहे. पण दर महिन्याला घरी असे खास आपल्याकरता मासिक येणे, मुलांनी त्याची वाट पाहणे आणि आल्यावर त्यात बुडून जाणे हे अत्यंत सकारात्मक चित्र आहे. ज्या पालकांना हे जमेल ती मुले सुदैवी!

मराठीतून शिक्षण विषयक कोणती मासिके प्रकाशित होतात? या प्रश्नाचे उत्तर शोधताना अत्यंत मोजकी नावे समोर येतात. शिक्षण संक्रमण, शैक्षणिक संदर्भ ही नावे गेल्या काही वर्षांत लक्षात राहिलेली आहेत.

छापील स्वरूपातील अंक प्रकाशित करणे दिवसे न दिवस कठीण होत चालले आहे. कारण खर्च अधिक आणि मागणी कमी अशी स्थिती आहे. यामुळे डिजीटल स्वरूपातील अंकाचा पर्याय समोर आला आहे. 'ग्राममंगल शिकणवेध' हा अंक शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा अंक म्हणून नावारूपाला आला आहे. याचे कारण म्हणजे रमेश पानसे यांच्यासारख्या निकोप शिक्षणविचार करणाऱ्या माणसाने त्याचे संगोपन केले. गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या अवतीभवतीचे जग झपाट्याने बदलत गेले आहे. विविध क्षेत्रांमध्ये सखोल संशोधनातून मोठी क्रांती झालेली आहे. आपल्या जगण्याच्या पद्धती आणि शैलीत केवढी तरी उलथापालथ झालेली आहे. असुरक्षितता, अनिश्चितता, जुन्या मूल्य विचारांची पडझड या सर्व परिस्थितीत आजचे शिक्षण कसे असायला हवे हा कळीचा प्रश्न आहे. हाच विचार शिक्षणवेध सारखे मासिक मांडते आहे.


उच्चशिक्षण हा विषय बालशिक्षणाच्या भक्कम पायावर आधारित आहे. पूर्वी शिक्षकाने त्यास प्राप्त ज्ञान विद्यार्थ्यांना देणे आणि त्यांनी ते ग्रहण करणे असा विचार केला जायचा, पण आता हा विचार बदलून ज्ञानरचनावादी विचार पुढे आला. त्यानुसार शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा आणि कुतूहलाला जागे ठेवून शिकण्यास अनुकूल वातावरण उभे करून द्यायचे आहे. ज्ञान मिळवण्यासाठी उत्सुक विद्यार्थी स्वतंत्र बुद्धीने विचार करणारा हवा. त्याला अनेक प्रश्न पडले पाहिजेत. त्याकरिता तो सतत सजग हवा आणि मुक्तपणे शिकत राहण्याची प्रेरणा जोपासणारा हवा. असे विद्यार्थी घडण्यात पालक व शिक्षकांचे योगदान कसे असायला हवे, हे 'ग्राममंगल शिक्षणवेध' मधून मांडले जाते आहे.पालकांना गाईड, क्लाससारख्या गोष्टी मुलांकरिता हव्या असे वाटते. हे इतके टोकाला गेले आहे की, मुलांची उपजत शिकण्याची प्रेरणा संपवून परजीवी विद्यार्थी घडवले जात आहेत. एखादे मासिक घरी सुरू करणे हे पालकांना महाग का वाटते?

लहान मुलांचे शिक्षण नीट झाले तर समाजविकास योग्य दिशेने होईल, त्यामुळे अशा मासिकांना जगवणे ही सामुहिक जबाबदारी आहे. उचित शिक्षण विचाराचे वारे खेळते ठेवण्याकरिता एवढे करूयाच!



# एका डोळियाने





मोरपीस

पूजा काळे

जोवर डोळे आहेत, तोवर स्वप्न सत्यात उतरवणारी अमुक एक रेषा हातावर गोंदवून घेतो आपण. सत्य स्वप्नातल्या अस्पष्ट परिघात समजावत बसतो स्वतःला. जसं की, धागा हलका असला तरी, असंख्य धाग्यांनी त्याला एकसंधपणा येतो. यात विरणाऱ्या धाग्यांची विण किती घट्ट, यापेक्षा जोडणाऱ्या धाग्याची लवचिकता महत्त्वाची ठरते. ही लवचिकता अंगिकारताना असंख्य वादळांना तोंड देण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी आलंय. अनामिका नामक नायिका जिने आपल्या कमकुवत मनावर मात केलीय. एखादा अनुभव तुम्हाला समृद्ध करतो हे म्हणणं खूप सोप्प असतं; परंतु तो सिद्धहस्ते घेताना त्यात ती व्यक्ती किती सहन करते, हे अनुभवापर्यंत गेलेल्यांनाच कळते. मनाची भाषा मनाला उमगते आणि त्या विषयीच्या तरल अवस्थेपर्यंत पोहोचते. तेव्हा मन आणि हृदयाव्यतिरिक्त, दुखाला वाट करून द्यायची इतर अवयवांची काय बिशाद होय? गमावलेला हात वा तुटलेला पाय असो, वा असो कुठलाही एखादा कमकुवत अवयव, तो अख्ख जग सहज हिंडू फिरू शकतो. पण डोळ्यांचं काय? ते तर जगजाहीर प्रकरण आणि हे प्रकरण अचानक काम करेनासे झाले तर. बघा तुम्हालाही प्रश्न पडला ना! किती महत्त्वाच्या विषयाला मी हात घातलाय तो! या सुंदर जगाची अनुभूती डोळ्यांशिवाय कशी घेणार हो!

**जे-जे चांगलं ते-ते पाहून घ्यावे.**
**असा हा अगाध डोळ्यांचा महिमा.**

डोळे हे जुल्मी गडे,
रोखूनी मज पाहू नका म्हणणारी प्रियतमा;
तिला तर केव्हाचं कळलेला असतो त्यातला रोखून बघण्याचा भाव. पाहण्यातला आनंद वर्णन करताना 'रोखून' या शब्दापाशी येत ती अडखळते. आजकाल या अनामिकेला हे असं काहीसं होतयं. प्रेमाच्या परीक्षेत पास व्हायला डोळ्यांची भाषा यायला हवी. भावनेची भाषा उमगणारे डोळे मनात आलेल्या कुठल्याही गोष्टीवर परिणाम साधतात. भावभावनेचा इशारा असो, वा रागाचा चढता पारा असो, मर्मभेदी डोळ्यांतून असा दर्शित होतो की " उमलली एक नवी भावना, बघत राहू दे तुझ्याकडे." असं म्हणत ती, सावध आणि सावजही होते. डोळ्यांच्या भाषेचा विचार हा, मृगनयना रसिक मोहिनी, होती ती मंजुळ मधुरालापिनी... मृगनयना रसिक मोहिनी.


मासा गळाला लागण्याइतपत मोहिनीवजा बाणाचे तीर पटाईत असतात. यथार्थ अशा या गाण्याच्या ओळी खूप मागे घेऊन जातात. अनामिकेला, जेव्हा डोळ्यांना साधं दिसणंही बंद झालं होतं तेव्हाची भावना कमालीची भयंकर. वीज पडून जमीनदोस्त करणारी. भयानक वास्तव्य आ ऽऽऽ वासून पुढ्यात ठाकलेलं. डोळ्यांत मिट्ट काळोख दाटावा... रडणंही मुश्किल व्हावं. वीज अचानक बंद पडावी. लाल, हिरव्या, पिवळ्या वीजवाहक तारांनी पायात पाय घालून गुरफटून घ्यावं. या घडीला आलेला आंधळेपणा म्हणजे तात्कालिक बोर्डाचा बंदचा इशारा. समोर दाट अंधार. सारं जग थांबून सगळं संपुष्टात आल्याचा हाचं तो क्षण. वेदनेसोबत पुन्हा नव्या वेदना. नव्या कोऱ्या जाणिवा. जग पाहण्याची स्वप्न डोळ्यांत उतरवत कितीतरी रात्री जागून काढल्याच्या तक्रारी तिचा चेहरा सांगू लागलेला. बोलू लागलेला. पण ती निग्रही. या अपार भवसागरात निश्चयाचा महामेरू उचलण्याची ताकद ठेवून सज्ज झालेली. असं म्हणतात की, स्वतःला जसंच्या तसं स्वीकारलं की, दुःख पसरायला वाट मिळत नाही. आतल्या आत विरून जात ते. फक्त हवा असतो तो विश्वास, जो निश्चित तिच्याकडे आहे. रंगहीन डोळ्यांनी बघितलेलं जग जटिल स्वप्नांनी भारलेलं, डोळ्यांसमोर नाचणाऱ्या चित्रविचित्र काळ्या बाहुल्या मनाचा संयम तोडणाऱ्या. महिन्याभरात उघडलेले डोळे नव्या स्वप्नांची नवी वाट दाखवतील, हा आशावाद घेऊन वावरताना. अनामिकेची अवस्था गाण्यातल्या नायिकेसारखी झालीय.

**तुला पाहते रे, तुला पाहते जरी आंधळी मी, तुला पाहते...तुझी मूर्त माझ्या उरी राहते...रे...**

एकीकडे तिच्या मनातलं अवकाश तर, पल्याड डोळ्यांच्या खोबणीत वसलेली स्वप्न. इवल्याशा रंगीत स्वप्नांचा मोरपिसारा फुलवत, डोळे आषाढ घनांची बरोबरी करण्यास सरसावलेत. जेव्हा आसमंत होईल लडिवाळ तेव्हा निळ्या पांढऱ्या शुभ्र टपोऱ्या अश्रूंची बरसात आभाळ मायेस स्पर्शून जाणारी ठरेल. ढगाळलेल्या वातावरणात धुंदी चढवत आलेला गार वारा झोका घेत स्वार होईल समुद्रावर. लाटा धडकतील किनाऱ्यावर. टपोऱ्या डोळ्यांत दाटून येतील नभ. डोळ्यांना मान्य नसेल कडेलोट आसवांचा पण बरसणाऱ्या पावसात चिंब होणाऱ्या अश्रूंना गवसेल वाट. गालावर ओघळणारे खारट पाण्याचे थेंब म्हणजे किनाऱ्याला सागराची ओढ. ओघळणारा पाऊस नक्षीदार छाप काढेल गालावर. प्रियतमेला सोडवणार नाही हा क्षण. हुंकार दाटेल, कोलाहल माजेल. समुद्राचा तळ गाठता येत नसला तरी, डोळ्यांना गवसणारा प्रीतीचा किनारा हा असा बहरेल.

**जिथे सागरा धरणी मिळते...तिथे तुझी मी वाट पाहते, वाट पाहते...**

आषाढसरी नंतर पाणावलेले डोळे श्रावणसरीत भिजतील. मनोहारी हिरव्या-पिवळ्या वृक्षपर्णिचे अनाकलनीय गूढ उतरेल डोळ्यांत आणि त्याचवेळी तो बोलून जाईल सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला डोळ्यांच्या कडेकडेने साठेल सरबरीत पाऊस. ओलेत्या अंगणातली निळाई रूजवत जाईल पांढऱ्या पटलावर. अनामिकेचं आरशातलं प्रतिबिंब अजूनही धुसर धूसर, आपल्याचं सुंदर चेहऱ्याची ओळख पुसणार इतकं क्रूर. का? कशासाठीची? उत्तर अनामिकेकडे नसली तरी, अनवट वाटेच्या ब्लॅकआऊटमधून शिक्षा वजा शिकवणुकीचा मोठा धडा घेत तिने चालणं स्वीकारलयं. उघड्या दोन डोळ्यांना दिसणारी खाच खळग्यांची पूर्वीची दुनिया आणि या क्षणाचा एका डोळ्याने अनुभवलेला दाह, निर्माण झालेला दृष्टीदोष तिला आत्मविश्वास देईल, ज्यामुळे ती सिद्ध होईल एक पाऊल पुढे टाकण्यासाठी.




# करियर निवड आणि गोंधळलेली मुले



विशेष

**आरती बनसोडे**

(मानसिक आणि करियर काउन्सलर)

पूर्वी दहावी-बारावीचे निकाल जाहीर झाले की ठराविक करियर निवडले जायचे कारण करियर म्हणून निवडायला जास्त विकल्प उपलब्ध नव्हते, पण आताच्या परिस्थितीत घरोघरी पालकांची एकच लगबग सुरू असले ती म्हणजे आता पुढे ॲडमिशन कुठे घ्यायचे, कुठल्या वाटेला जायचे, कोणते करियर आपल्या मुलांसाठी योग्य असेल? विद्यार्थ्यांची देखील तीच तारांबळ उडते. हल्ली करियरच्या इतक्या विविध वाटा उपलब्ध आहेत आणि त्यामुळेच हल्ली बालक आणि पालक दोघेही गोंधळात पडले आहेत.

पूर्वी करियर निवडीचा इतका गोंधळ झालेला आपण बघितला नव्हता पण हल्ली जितके जास्त विकल्प तितका जास्त गोंधळ होता. एका कोर्ससाठी शंभर महाविद्यालय उपलब्ध असतात मग त्यातून नक्की कोणते करियर अणि का निवडायचे हा देखील प्रश्न असतो. शिवाय हल्ली रेग्युल्लर पेक्षा इंटिग्रेटेड विद्यालयात प्रवेश घेणे जास्त पसंत केले जाते. त्यामुळे नक्की आपल्यासाठी काय योग्य आहे या संभ्रमात पालक आणि विद्यार्थी असतो.

सगळ्यांनी आधी हे समजून घेणे आवश्यक आहे की करियर म्हणजे नक्की काय आणि ते निवडताना कोणत्या गोष्टीची काळजी घेतल्यास पुढील मार्ग सुखकर होईल?

करियरची निवड चुकीची नसते पण ती निवडल्यानंतर योग्य दिशा न मिळाल्यास नंतर मात्र पश्चातापाची वेळ येते. ज्या गोष्टीमुळे आपल्याला आनंद, समाधान आणि सुखकारक जीवन जगण्या इतपत पैसे मिळतात, जी गोष्ट करताना आपल्याला थकवा जाणवत नाही, कुणी जबरदस्ती आपल्यावर लादल्यासारखे वाटत नाही त्या गोष्टी करिअर म्हणून निवडल्यास पुढे सुखकारक वाटते. कारण मानसिक समाधान आणि शांती या पुढील जीवनामध्ये फार महत्त्वाच्या गोष्टी असतात. पण देखाव्याचे चकमकीत करियर आणि सहज पैसे कसे मिळतील यामुळे किशोरवयीन मुलांना करियर निवडताना ते समजत नाही.

शिक्षण पूर्ण झाल्यावर आपण आपल्या आयुष्यातील दिवसाचे ८-९ तास काम करत असतो आणि अशा वेळेस आपण आपले न आवडते काम करत राहिलो तर जीवनाचा आनंद गमावून बसतो. करियर ही अशी गोष्ट आहे की एकदा घेतलेला निर्णय पुढे जाऊन बदलणे इतके सोपे नसते आणि यामध्ये वेळ आणि पैसे वाया जाऊन मुलांना व त्यांच्या कुटुंबियांना मनस्ताप होतो. त्यामुळे योग्य सल्ला घेऊन करियर निवडणे आणि निवडलेल्या करियरला यशस्वीपणे आनंदात निभावणे फार महत्वाचे असते. यासाठी मुलांच्या आवडीनिवडी, व्यक्तिमत्व, कल आणि त्यांची बुद्धिमता यांची सांगड घालून त्यांना दिशा दाखवणे ही पालकांची मूलभूत जबाबदारी आहे.

हल्लीच्या स्पर्धात्मक युगामध्ये मुलांचा भरपूर गोंधळ झालेला आढळतो, मुलांवर बऱ्याच प्रकारचा दबाव दिसून येतो आणि त्यातच पालकांच्या अपेक्षा, मार्कांची वाढलेली स्पर्धा यामुळेच मुलांवर मानसिक त्रास ओढवतो. म्हणून करियर निवडताना काही गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. मुलांवर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती न करता त्यांच्या आवडीप्रमाणे करिअर निवडायला पालकांनी मदत करणे आवश्यक असते. आता पूर्वीप्रमाणे परिस्थिती राहिलेली नाही की हुशार विद्यार्थ्यांनी सायन्स निवडावे, मध्यम बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांनी कॉमर्स निवडावे आणि कमी बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांनी कला क्षेत्र निवडावे आता हे चित्र बदलले आहे. आता विद्यार्थी आवड असलेल्या क्षेत्रामध्ये उच्चतम शिक्षण घेऊन, उच्च स्तराला जाऊन आणि आपले टॅलेंट वापरून आपल्या आवडीच्या क्षेत्रात भरारी घेऊ शकतात. म्हणून पालकांनी विद्यार्थी केवळ इंजीनियर डॉक्टर व्हावा या अपेक्षा बदलल्या पाहिजेत. हल्ली याच गोंधळामुळे विद्यार्थी आणि पालक यांमध्ये मतभेद होऊन करियर काउंन्स्लिंग ही संकल्पना जोर धरत आहे.

ज्यामध्ये मुलांच्या विविध आयक्यू चाचण्या, ॲप्टिट्यूड टेस्ट, बेन मॅपिंग, डीएमआयटी अशा विविध चाचण्या करून मुलांचा कल ठरवून करिअर निवडीसाठी मार्गदर्शन केले जाते. या चाचण्यांचे निकष खरे असतीलच असे नाही, कारण विद्यार्थ्यांची आवडनिवड, कल, व्यक्तिमत्व या गोष्टी मुलं आणि पालकांनी आपापसात चर्चा करणे अधिक प्रभावीपणे करियर निवडीसाठी उपयुक्त ठरते. बऱ्याचदा मुलांना करियर करायची इच्छा असते; परंतु घरातली आर्थिक परिस्थिती पाहता मुलांना त्यांच्या आवडीचे करियर करणे शक्य होत नाही.

बऱ्याचदा मुलांना व पालकांना विविध नवीन क्षेत्रांची माहिती नसल्याने देखील त्यांना करिअरची निवड करणे जमत नाही.

हल्ली नृत्य, गायन किंवा चित्रकला यासारख्या सगळ्या क्षेत्रांमध्ये उच्चशिक्षण उपलब्ध आहे जे प्राप्त करून स्वतःचा व्यवसाय करता येतो. त्याचप्रमाणे परदेशामध्ये जाऊन नोकरी सोबतच आपल्या कला देखील सादर करता येतात. जग जवळ आले असल्याने भाषांतर करण्यासाठी जागतिक पातळीवर विविध भाषा येणे देखील एक चांगले करियर विकल्प आहे. त्याचप्रमाणे एनिमेशन, डिजिटल मार्केटिंग, डेटा सायंटिस्ट, डेटा अर्नलिस्ट, इन्फोटेक्नालाजी, सिनेमॅटोग्राफी, व्हिडिओ एडिटिंग, डिजिटल मार्केटिंग, सायबर सिक्युरिटी, आर्टिफिशियल टेक्नॉलॉजी यांसारख्या नवीन नवीन करियरच्या संधीदेखील मुलांसाठी उपलब्ध झालेल्या आहेत. एरोनॉटिकल इंजिनीरिंग, एरोस्पेस इंजिनीरिंग, एव्हिएशन इंडस्ट्रीमधील करियर, ग्राऊंड स्टाफ, डिफेन्समधील करिअर, फॅशन डिजाइनिंग, इंटेरियर डिझाइनिंग, ब्यूटी निगडित करियर अशा अनेक संधी मुलांना उपलब्ध झालेल्या आहेत.

एमबीबीएसला ॲडमिशन मिळाले नाही म्हणून बऱ्याच मुलांचा आणि पालकांचा हिरमोड होतो; परंतु वैद्यकीय क्षेत्रातच विविध पॅरामेडिकल कोर्सेस करून बऱ्याच करियरच्या संधी उपलब्ध असतात.

ज्यांना प्राण्यांविषयी ओढ आहे, आवड आहे ते वेटरनरी डॉक्टर हा देखील पर्याय निवडू शकता. ज्यांचे वक्तृत्व चांगले आहे, स्टेजवर बोलायची भीती वाटत नाही, लोकांशी संवाद साधायला आवडतो त्यांच्यासाठी व्यावसायिक वक्ता किंवा प्रशिक्षक बनणे हा देखील पर्याय उपलब्ध आहे. कोणत्याही व्यवसायाला आपली आवड बनवून त्यातून पैसे कमावणं हे आतां इतकं कठीण राहिलेलं नाही; परंतु हल्लीच्या मुलांना कष्ट करायची वृत्ती नसून सहजपणे पैसे कसे कमावता येतील याकडेच त्यांचा अधिक कल असतो म्हणून हल्लीचा पालक आणि बालक दोघेही गोंधळलेले आहेत. ज्यांची कष्ट करण्याची तयारी असते त्यांना कोणतेही काम करण्याची भीती वाटत नाही आणि त्यातून पैसे कसे कमवायचे हा आपल्या बुद्धिमतेचा भाग असतो. आपली कौशल्य वापरून यातून उत्पन्न तयार करणे आणि आपल्या आवडी जोपासणे हे देखील हल्लीच्या पिढीला जमत नाही आणि त्यामुळे त्यांना मानसिक त्रास होतो. शिवाय मोठमोठी स्वप्न पूर्ण करण्यासाठी होम लोन, कार लोन अशा विविध कर्जामुळे देखील निवडलेल्या करिअरचा आनंद लुटता येत नाही.

निवडलेल्या करियरमध्ये आनंद कसा मिळवायचा हे आपल्या हातात असते. निवडलेले करियर यशस्वी बनवणे आणि आनंदी राहणे जमले तर करियरच्या वाटा निवडताना भावनिक पसारा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.




# कोलाज

## चला महाराष्ट्र घडवूया









काळोखाच्या गावी, प्रकाशाच्या वाटा

**श्रद्धा बेलसरे खारकर**

देश बदलला पाहिजे असे सगळेच बोलतात, पण किती लोक त्यासाठी स्वतः प्रयत्न करतात? बऱ्याच लोकांना नक्की काय करायचे आहे हेही समजत नसते. आपल्याकडे बोलके सुधारक खूप आहेत. पण परवा मला सातत्याने निष्ठा ठेवून काम करणारा असा एक तरुण दिसला जो गेली २२ वर्षे हा प्रयत्न करतो आहे.

त्याचे नाव आहे शिवराज पाटील. छोट्या खेड्यातून आलेला शिवराज जात्याच हुशार होता. त्याला अधिकारी व्हायचे होते. घरची परिस्थिती फारशी बरी नव्हती. मग त्याने जिद्दीने अभ्यास केला आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत तो पहिल्या प्रयत्नात प्रिलीयम पास झाला. त्याला कलेक्टर व्हायचे होते. लेखी परीक्षेत चांगले गुण मिळाले होते. भरपूर तयारी करून तो मुलाखतीसाठी दिल्लीला पोहोचला. पण तोंडी परीक्षा पास होऊ शकला नाही. कारण मुलाखतीचे तंत्र माहीत नव्हते आणि आत्मविश्वास, धीटपणा यांचा अभाव आडवा आला. निराश होऊन तो गावी परतला. काही दिवस निराशेत गेले. नंतर मात्र त्याने ठरवले ‘मला अपयश आले ते इतरांना येऊ नये यासाठी आपण काहीतरी करायचे. हाती पैसा नव्हता, घरचे पाठबळ नव्हते आणि महत्त्वाचे म्हणजे अनुभव नव्हता. त्याने स्पर्धा परीक्षा तयारीसाठी नव्या तरुणांना शिकवायचे ठरवले. पण कुठे शिकवणार? आणि या नवख्या तरुणाकडे शिकायला तरी कोण येणार? त्याने पुण्याच्या अनेक कॉलेजांमध्ये खेटे घातले. खूप वाईट अनुभव आले. फुकट शिकवणार आहे म्हटल्यावर ‘आम्हाला काय मिळणार?’ या त्यांच्या प्रश्नाला शिवराजकडे काहीही उत्तर नव्हते. त्यामुळे त्याच्यावर विश्वास ठेवून काही तासांकरताही जागा द्यायलासुद्धा कुणी तयार नव्हते. पण तो हरला नाही.

रोज विविध ठिकाणी जाऊन शिवराज आपले म्हणणे सांगायचा. एखादा तास तरी जागा द्या अशी गळ घालायचा. अखेर एका कॉलेजने परवानगी दिली आणि त्याची शिकवणी सुरू झाली. कधी वर्ग मिळाले नाही, तर झाडाखाली शिकवले. शिवराजला फक्त अधिकारी तयार करायचे नव्हते, तर चांगला माणूस घडवायचा हे अवघड ध्येयही त्यांच्या मनात होते. हळूहळू घडी बसू लागली. एका दानशूर व्यक्तीने पुण्यात मध्यवस्तीत चार क्लास रूम दिल्या. रोजचे वर्ग सुरू झाले. शिवराजची शिकवणी मुलांना आवडू लागली.

स्पर्धा परीक्षेची तयारी हा मोठा विषय आहे. फार मोठा अभ्यासक्रम असतो. प्रत्येक मुलाला त्याच्या आवडीप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे विषय निवडावे लागतात. साधारण लोकसेवा आयोगाच्या तयारीसाठी १० महिने लागतात. शिवराजच्या चांगल्या स्वभावामुळे त्याची एक टीम तयार झाली. सगळेजण ध्येयाने प्रेरित झाले होते. एक महत्त्वाचे तत्त्व ठरले होते. कुणाकडूनही कुठल्याही परिस्थितीत एकही पैसा घ्यायचा नाही.

**एक घास फाऊंडेशन**

शिवराजने दूरचे नियोजन करून मग ‘एक घास फाऊंडेशन’ नावाची संस्था स्थापन केली. त्याच्या संस्थेचं सगळ्यात महत्त्वाचं तत्त्व हे होतं की स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या मुलांना वर्षातून १० महिने शिकवायचे मात्र त्यांच्याकडून एकही रुपया घ्यायचा नाही. या मुलांना इतकेच सांगितले जाते की महिन्यात दोन दिवस फाऊंडेशनसाठी द्या. त्या दोन दिवसांत अनेक समाजोपयोगी कामे केली जातात. काही विद्यार्थी नव्या बॅचला मोफत शिकवतात. पुण्यात अशाच प्रकारचे क्लास घेणाऱ्या वर्गाची फी आहे किमान एक लाख ते तीन लाख रुपये!

परीक्षेस बसणारे सारेच काही अधिकारी होत नसतात. काही तलाठी होतात काही इतर छोटीमोठी कामे करतात पण तो प्रामाणिक असला पाहिजे यावर शिवराजचा कटाक्ष असतो. खूप वेळ स्पर्धा परीक्षेत यश न आल्यामुळे मुले नाराज होतात. नैराश्यात जातात. पण आधीच सर्व शक्यतांची कल्पना दिल्यामुळे मुलांना सर्व गोष्टी स्पष्ट होतात. ‘एक घास’मध्ये शिकलेले आजवर ४५० लोक वर्ग १ ते वर्ग ३ मध्ये अधिकारी झाले आहेत. ते सर्व मनोभावे फाऊंडेशनचे काम करत आहेत. बार्टी या संस्थेमार्फत दरवर्षी अनेक मुलांना शिष्यवृत्ती आणि स्टायपेंड दिला जातो. त्यातल्या अनेक जणांना मोठे क्लासवाले घेतात. कारण महिना लाख रुपये प्रती विद्यार्थी मिळतात. शिवराजनी बार्टीला असा एक प्रस्ताव दिला की ज्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही त्यांना आम्ही एक रुपया न घेता शिकवू. तशी यावर्षीही डिसेंबरमध्ये नवीन बॅच सुरू झाली आहे.

तरुणात सरकारी पदांबद्दल प्रचंड आकर्षण आहे. त्यामुळे अशा क्लासेसना खूप मागणी आहे. मोठ्या शहरांच्या आसपास अनेक नामवंत संस्था स्पर्धा परीक्षेच्या तयारीच्या नावाने खूप पैसे मिळवतात पण शिवराज पाटीलांचा मात्र मोफत शिकवण्यावर भर आहे.

बहुतेक मुले १२ वी नंतर किंवा पदवी मिळाल्यावर स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. पण स्पर्धा परीक्षेची माहिती जर शाळकरी वयात मिळाली, तर त्याचा जास्त फायदा होऊ शकतो. म्हणून पाचवीपासून स्पर्धा परीक्षेची तयारी असा एक उपक्रम सुरू केला आहे. विविध शाळांमध्ये हा उपक्रम सुरू झाला आहे. आठवड्यातून एक तास ही माहिती मुलांना दिली जाते. त्याचबरोबर दरमहा पालकांनाही सर्व माहिती दिली जाते. त्यामुळे मुलांबरोबर पालकांमध्येही जागरुकता येते. आता शिवराजचा २२ वर्षांत मोठा गोतावळा तयार झाला आहे. त्यातून नवे काही उपक्रम सुरू झाले आहेत. त्याच्या एक घास फाऊंडेशनतर्फे ५ अनाथाश्रमात दर महिन्याला शिधा पोहोचवला जातो. त्यांच्या शिक्षणासाठी मदत केली जाते. मला जे महत्त्वाचे वाटते ते म्हणजे गरीब, दीनदुबळ्या लोकांविषयीशिवराजला असलेली तळमळ मी बघितले आहे की, अनाथाश्रमात शिधा पोहोचवायला गेल्यावर तो त्या मुलांबरोबर खेळतो, बोलतो त्यांच्यातला एक होतो. वृद्धाश्रमातले आजीआजोबा त्याची वाट बघत असतात.

शिवराज हे काम एकट्यानेच करत नाही. त्याची पत्नी मोनिका सर्वार्थाने त्याच्याबरोबर आहे. आजवर ४५० मुलांना अधिकारी करणारा आणि अडीच लाख मुलांना विनामूल्य शिकवणारा शिवराज नक्कीच महाराष्ट्र घडवेल अशी मला आशा वाटते आणि तो महाराष्ट्र प्रामाणिक आणि देशभक्त मुलांचा असेल हे महत्त्वाचे!

# डॉ. कोटणीस की अमर कहानी



**डॉ. कोटणीसांचा जन्म वेंगुर्ल्यात झाला नसला, तरीही कोटणीस कुटुंब हे मूळचे वेंगुर्ल्याचे असून, अनेक वर्षे ते वेंगुर्ल्यातच राहत होते. वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी १९४६ साली डॉ. कोटणीस यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.**



कोकण आयकॉन

**सतीश पाटणकर**

१० ऑक्टोबर १९१० रोजी सोलापूर येथे डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचा जन्म झाला. डॉ. कोटणीस यांचे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले या शहराचे घट्ट नाते होते. डॉ. कोटणीसांचा जन्म वेंगुर्ल्यात झाला नसला, तरीही कोटणीस कुटुंब हे मूळचे वेंगुर्ल्याचे असून, अनेक वर्षे ते वेंगुर्ल्यातच राहत होते. डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण काही काळ वेंगुर्ल्यातील रा. कृ. पाटकर हायस्कूलमध्ये झाले. तेथेच त्यांच्या भावी आयुष्याची पायाभरणी झाली, असे आज अभिमानाने सांगितले जाते.

वडील शांताराम यांच्या नोकरीच्या निमित्ताने कोटणीस कुटुंबीय नंतर सोलापुरात स्थायिक झाले; मात्र त्या कुटुंबाचे वेंगुर्ल्याशी असलेले ऋणानुबंध मात्र कधीच तुटले नाहीत. वेंगुर्ले येथील बॅ. खर्डेकर रोडलगतच असलेले ‘कोटणीस हाऊस’ हे डॉ. कोटणीस यांचे मूळ घर. हे घर स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात ‘काँग्रेस हाऊस’ म्हणून ओळखले जाई. त्या काळात महात्मा गांधी, डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासारखे अनेक प्रमुख नेते या ‘कोटणीस हाऊस’मध्ये मुक्कामाला येत असत. डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे काका काही वर्षे वेंगुर्ले नगरपालिकेचे उपाध्यक्षही होते.

डॉ. कोटणीस यांच्या पत्नी डॉ. को-चिंग-लान यांनी जीवनाच्या अखेरपर्यंत वेंगुर्ल्याशी ऋणानुबंध उत्तमरीत्या जपले होते. वेंगुर्ले आणि एकूणच परिसरातील सार्वजनिक आरोग्याची दैन्यावस्था पाहून त्या व्यथित होत. ही अवस्था दूर करण्यासाठी आपण काही तरी केले तरच आपल्या पतीच्या ऋणातून आपला देश (चीन) काही प्रमाणात मुक्त होईल असे त्यांना वाटे.

डॉ. कोटणीस या महान माणसाच्या सेवाभावी वृत्तीचे गोडवे आजही चीनमध्ये गायले जातात.

चीनमधला कोणताही बडा नेता भारतात आला की, तो एका कुटुंबाची हमखास भेट घेतो... मुंबईच्या कोटणीस कुटुंबाची. कोण होते डॉ. कोटणीस, ज्यांना चीनमध्ये इतका मान दिला जातो? दुसऱ्या महायुद्धावेळी चीन आणि जपान एकमेकांविरुद्ध लढले होते. त्यावेळी एका भारतीय डॉक्टरने आपले प्राण धोक्यात घालून अनेक चिनी सैनिकांचे प्राण वाचवले होते. डॉक्टर द्वारकानाथ शांताराम कोटणीस हे त्यांचे नाव. जपान आणि चीनमधले युद्ध पेटल्यानंतर चीनचे अनेक सैनिक जखमी झाले. त्यापैकी अनेकांना प्लेगची लागण झाली होती. त्यांना वैद्यकीय मदत मिळावी या उद्देशाने भारतीय वैद्यक मिशनने एक टीम चीनला पाठवली. त्या टीममध्ये डॉ. कोटणीस हे एक होते. ते आपले काम अतिशय मन लावून करत असत. त्यांनी केलेल्या सेवेमुळे अनेक चिनी सैनिकांचे प्राण वाचले. युद्धभूमीवर प्लेगची भीषण लागण झाली होती. सैनिकांवर उपचार करण्यास इतर डॉक्टर लोक घाबरत असत पण कोटणीस कधी घाबरले नाहीत.

त्यांनी किमान ८०० जणांवर उपचार केले असावेत असे म्हणतात. तिथल्या भीषण परिस्थितीमुळे त्यांच्यासोबत भारतातून आलेले डॉक्टर घरी परतले, पण कोटणीस त्या ठिकाणीच थांबले. त्यांच्यात असलेल्या या समर्पण भावामुळेच त्यांचा चीनमध्ये आदर केला जातो.

वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी १९४६ साली डॉ. कोटणीस यांचं अल्पशा आजाराने निधन झालं होतं. "सैन्याने एक चांगला सहकारी आणि देशाने एक चांगला मित्र गमावला आहे. त्यांची आठवण सदैव आपल्या मनात तेवत ठेवूया," असे उद्गार चीनचे तत्कालीन सर्वोच्च नेते माओ झेदांग यांनी कोटणीसांना आदरांजली वाहताना काढले होते.

चीनच्या हेबेई प्रांतात कुटाँग खेडे आहे. तेथे डॉ. कोटणीस यांच्या स्मृतिरूपाने जुने हॉस्पिटल जतन केले आहे. त्यांची खोली जतन केली आहे. या खेड्यात प्रवेश केल्यानंतर चौकातच डॉ. कोटणीसांचा अर्धपुतळा आहे. त्यांच्या कृतज्ञतेसाठी चीनमध्ये आजही त्यांचे भव्य स्मारक उभे आहे. डॉ. कोटणीस यांनी देश, जाती, धर्म या बंधनांच्या पलीकडे जाऊन मानवतेची खऱ्या अर्थाने पूजा केली असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही.

भारतात मात्र त्यांची आठवण कुणी फारशी काढताना दिसत नाही. फक्त काही पाठ्यपुस्तकांमध्ये त्यांचा उल्लेख असतो. व्ही. शांताराम यांनी त्यांच्या जीवनावर डॉ. कोटणीस की अमर कहानी हा चित्रपट काढला होता. चीनमध्ये ते आजही अत्यंत आदरणीय आहेत. चीनने त्यांच्या नावाचे पोस्टाचे तिकीट छापले आहे. हंबे या भागात त्यांचे स्मारक उभारण्यात आले आहे. या शतकातील ‘चीनचे सर्वांत जवळचे परदेशी मित्र’ असे सर्व्हेक्षण २००९ मध्ये इंटरनेटच्या माध्यमातून करण्यात आले होते. या यादीमध्ये नाव डॉ. कोटणीस यांचेही नाव होते. डॉक्टरांचा आजही चीनमध्ये खूप आदर केला जातो असं चायना डेली या वृत्तपत्राने म्हटले आहे. डॉ. कोटणीस यांच्या लोकप्रियतेचे कारण काय आणि १९५० सालापासून आजपर्यंत त्यांच्या कुटुंबीयांना चीनचे नेते का भेट देतात?"१९६२ साली भारत आणि चीनचे संबंध बिघडले. पण कधीकाळी दोन्ही देशांनी परदेशी राजवटीविरुद्ध आणि वसाहतवादाविरुद्ध लढा दिला आहे. या भेटीमागे हा देखील समान धागा आहे," असं चीनविषयक धोरणांचे अभ्यासक श्रीकांत कोंडापल्ली यांचं म्हणणं आहे.

